शुक्रवार, 19 ऑगस्ट 2022
किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 02 अंक - 24
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

गोपाळ काला

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● FRIDAY 19 AUGUST 2022 | adhunikkesari.com Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-24 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5

# प्रो-दहीहंडी सुरू होणार

## शासकीय नोकरीत स्थान देणार; मुख्यमंत्र्यांची मोठी घोषणा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : दहीहंडीच्या पूर्वसंध्येला राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रो-कबड्डीप्रमाणे प्रो-दहीहंडी सुरू होणार असल्याची घोषणा केली असून दहीहंडीला खेळाचा दर्जा देण्यात आला आहे. गोविंदाना शासनाच्या इतर सुविधांचाही लाभ मिळणार आहे. यासोबतच शासकीय नोकरीत 5 टक्के स्थान देण्यात येणार आहे. तसेच दहीहंडी उत्सवात मानवी मनोरे तयार करताना दुर्घटना होऊन गोविंदांचा अपघाती मृत्यू होतो किंवा ते जखमी होतात. अशा गोविंदांना व त्यांच्या कुटुंबियांना हातभार लावण्यासाठी मुख्यमंत्री सहायता निधीतून आर्थिक सहाय्याची योजना आखण्यात आली आहे.**

गोविंदा पथकातील खेळाडुचा दहीहंडीच्या थरावरुन पडून मृत्यू झाल्यास कायदेशीर वारसास 10 लाख रुपयाचे आर्थिक सहाय्य करण्यात येईल. दहीहंडीच्या थरावरुन प्रत्यक्ष पडून दोन्ही डोळे अथवा दोन्ही हात, दोन्ही पाय अथवा कोणतेही महत्त्वाचे दोन अवयव निकामी झाल्यास त्याला 7 लाख 50 हजार रुपये इतके आर्थिक सहाय्य करण्यात येईल. दहीहंडीच्या थरावरुन पडल्याने एक हात किंवा एक पाय किंवा कोणताही एक महत्त्वाचा अवयव निकामी झाल्यास किंवा गंभीर इजा झाल्यास त्याला 5 लाख इतके आर्थिक सहाय्य केले जाईल.

हा आदेश केवळ या वर्षीसाठी (वर्ष 2022) लागू राहील. दहीहंडी उत्सवात सहभागी होणाऱ्या गोविंदांचा विमा उतरविण्याबाबत स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात येईल. या संदर्भात विम्याचा प्रिमियम भरण्याची योजना शासन तपासत असून दहीहंडी उत्सव उद्याच असल्याने विमा योजनेच्या बाबतीत कार्यवाही करण्यासाठी कमी कालावधी असल्याने आर्थिक सहाय्य देण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.



### आर्थिक सहाय्य मिळण्यासाठी अटी व शर्ती लागू

दहीहंडीसाठी स्थानिक आवश्यक परवानग्या असणे गरजेचे आहे, न्यायालय, प्रशासन व पोलीस यंत्रणेकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सुचनांचे आयोजक संस्था तसेच गोविंदा पथकांनी पालन करणे आवश्यक आहे, गोविंदांच्या सुरक्षेची सर्व काळजी संस्थांनी घेतलेली असावी, त्याचप्रमाणे पथकातील सदस्यांनी औपचारिक किंवा अनौपचारिक प्रशिक्षण घेतलेले असावे, मानवी मनोरे तयार करण्याव्यतिरिक्त अन्य कारणांमुळे अपघात किंवा दुर्घटना झाल्यास सदर आर्थिक सहाय्य अनुज्ञेय राहणार नाही, गोविंदांच्याबाबतीत वयोमर्यादेचे पालन करणे बंधनकारक असून 18 वर्षाखालील सहभागी गोविंदांना आर्थिक सहाय्य अनुज्ञेय राहणार नाही, मानवी मनोरे रचताना अपघात झाल्यास गोविंदांना तात्काळ वैद्यकीय मदतीची कार्यवाही आयोजकांनी स्थानिक प्रशासनाच्या सहाय्याने करणे गरजेचे आहे, मनोरे रचताना झालेल्या अपघाताबाबत आयोजकांनी तात्काळ स्थानिक प्रशासन, पोलीस यंत्रणेकडे तत्काळ अहवाल देणे आवश्यक आहे.



# 'गोदावरी नदी'ला रौद्ररुप

## 'जायकवाडी'तून पुन्हा वाढविला विसर्ग

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** जायकवाडीत पाण्याची आवक वाढल्याने विसर्ग वाढविण्यात आला, परिणामी 'गोदामाई'ला रौद्र स्वरूप आले. यात 'मोक्षघाट'-'नाथघाट' बुडाले तर गागाभट्ट चौकात नदीचे पाणी आले आहे.

नाथसागराच्या वरच्या भागातील धरणातून मोठ्याप्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू आहे. त्यामुळेच नाथसागर धरणातूनही पाणी विसर्ग वाढवण्यात आला आहे. पैठण शहर व नाथ मंदिर परिसरातील गोदावरी नदी पात्रातील जल फुगवटा देखील मोठ्या प्रमाणात वाढत गेला आहे. गुरुवारी दिवसभर ७६ हजारहून अधिक क्युसेक क्षमतेने गोदावरी नदी पात्रात विसर्ग सुरू होता अशी माहिती नियंत्रण कक्षातुन देण्यात आली. त्या आधी तहसीलदार दत्तात्रय निलावाड यांनी महसूल पथकासह जायकवाडी धरण, गोदावरी नदी काठ, परिसरात जाऊन परिस्थितीची पहाणी करून आढावा घेतला. खबरदारी घेण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

**आठरा दरवाजे चार फुट उचलून ७६ हजार विसर्ग**

# शिस्तबद्ध भारतीय जनता पक्ष

आधुनिक केसरी

काल भारतीय जनता पक्षाच्या अत्यंत महत्वाच्या काही समित्यांची पुनर्रचना केली आहे. भारतीय जनता पक्ष एक शिस्तबध्द आणि केडरचा पक्ष आहे. ईथे सर्वच लायक, कार्यक्षम, तरूण, उमद्या नेत्यांना रोटेशन पध्दतीने विविध जबाबदाऱ्या देऊन तयार केले जाते. यात मोठा, छोटा, पंख छाटणे, डावलणे असले कांही फालतू राजकारण चालत नाही.

पक्षाची रचनाच अशी असते की दिलेली जबाबदारी निमूटपणे पूर्ण क्षमतेने पार पाडणे क्रमप्राप्त असते. काल भाजप संसदीय मंडळाची पुनर्रचना करताना, नितीन गडकरी, शिवराजसिंह चौहान, योगी आदित्यनाथ आदी सहा मोठ्या नेत्यांना वगळून नवीन सहा नेते समितीत घेतले. हा नियमित होणारा बदल आहे. या बदलांमध्ये विरोधकांना आणि लाचार पत्रकारांना डावलणे दिसले. शहानवाज हुसेन, राहाटकर यांनाही वगळले. मग हेड लाईन्स फक्त नितीन गडकरींबाबतच का छापल्या.

मध्यप्रदेश चे मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान आणि उत्तरप्रदेश सारख्या सर्वात मोठ्या राज्याचे सर्वात यशस्वी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनाही तर यातून वगळले आहे. याचा अर्थ फक्त अतिरिक्त भार कमी करून नव्या दमाच्या आणि पुढील तीन वर्षातील निवडणूका डोळ्यासमोर ठेवून हे बदल करण्यात येत असतात.

त्याच वेळी पक्षाच्या निवडणूक समिती मध्ये देवेंद्र फडणवीस यांना घेतले म्हणजे नितीन गडकरींचे पंख छाटून देवेंद्र फडणवीस यांचेवर जास्त जबाबदारी टाकली असे होत नाही. देवेंद्र फडणवीस यांनी गोवा राज्याचे प्रभारी म्हणून, उत्तरप्रदेश आणि इतर दोन तीन राज्यात निवडणुकांचे काळात त्या त्या राज्यात जाऊन उत्तम काम केले होते. तसेच सध्या महाराष्ट्रात जे घडत आहे त्याचे सुत्रधार किंवा मास्टरमाईंड देवेंद्रजीच होते, आहेत. मग त्यांच्यातील कौशल्याचा उपयोग पक्षासाठी करून घेणे क्रमप्राप्तच असते. यात पक्ष वाढ, सर्वत्र सत्ता संपादन हेच मुख्य उद्देश असतात. यापूर्वीच्या समितीत राजनाथसिंह नव्हते मग त्यांना काय दुर्लक्षित केले होते काय? आता ते या समितीत आलेत. येडियुरप्पा आहेत. कारण कर्नाटक आणि दक्षिणेतील राज्ये याचा त्यांचा अभ्यास आहे. त्यामुळे कृपया उगाच गैर अर्थ काढू नयेत आणि पक्षाची जडणघडण समजून घ्यावी.

# आता परप्रांतीय करू शकणार मतदान

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** जम्मू-काश्मीरमध्ये या वर्षी विधानसभा निवडणुका होण्याची शक्यता आहे. या निवडणुकीमध्ये २५ लाख नवीन मतदार मतदान करु शकतात. राज्यात राहणारे परप्रांतीय लोकांना आपली नावे मतदार यादीत समाविष्ट करून मतदान करण्याची परवानगी निवडणूक आयोगाने दिली आहे. एवढेच नाही तर जम्मू-काश्मीरमध्ये सुरक्षेसाठी तैनात असलेले सुरक्षा दलाचे जवानही त्यांची नावे मतदार यादीत समाविष्ट करू शकतात अशी माहिती जम्मू आणि काश्मीरचे मुख्य निवडणूक अधिकारी हृदेश कुमार यांनी दिली.

निवडणूक आयोगाच्या या निर्णयावर जम्मू काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला आणि माजी मुख्यमंत्री मेहबूबा मुफ्ती यांनी तीव्र टीका केली आहे. निवडणुकांवर प्रङाव टाकण्यासाठी हा धोकादायक प्रयत्न असल्याचे दोघांनी म्हणलं आहे. जम्मू-काश्मीरमध्ये चार वर्षांहून अधिक काळ निर्वाचित सरकार नाही. त्यामुळे पुढील वर्षी निवडणुका होणे अपेक्षित आहे.

**गैर-स्थानिक आपले नाव मतदार यादीत समाविष्ट करू शकतात**

जम्मू-काश्मीरमध्ये सुमारे २५ लाख नवीन मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट होण्याची अपेक्षा आहे. कर्मचारी, विद्यार्थी, मजूर आणि काश्मीरमध्ये राहणारे कोणीही गैर-स्थानिक आपले नाव मतदार यादीत समाविष्ट करू शकतात. मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी स्थानिक रहिवासी प्रमाणपत्राची गरज नाही.

**भाजपाला तात्पुरते मतदार आयात करावे लागतात**

जम्मू काश्मीरच्या खऱ्या मतदारांच्या पाठिंब्याबद्दल भाजप इतका असुरक्षित आहे का? की त्याला जागा जिंकण्यासाठी तात्पुरते मतदार आयात करावे लागतील. जम्मू काश्मीरमधील लोकांना त्यांच्या मताधिकाराचा वापर करण्याची संधी दिली जाईल तेव्हा यापैकी कोणत्याही गोष्टीची भाजपला मदत होणार नसल्याचे मत जम्मू काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी व्यक्त केले आहे.

**निवडणूक निकालांवर प्रभाव टाकण्यावर भाजपाचा भर**

भाजपचा भर निवडणूक निकालांवर प्रभाव टाकण्यावर आहे. गैर-स्थानिकांना मतदान करण्याची परवानगी देणे म्हणजे निवडणुकीच्या निकालांवर परिणाम करणे. स्थानिकांना हतबल करण्यासाठी आणि जम्मू काश्मीरवर सत्ता गाजवण्यासाठी भाजपाचे उद्दिष्ट असल्याचा आरोप जम्मू काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री मेहबूबा मुफ्ती यांनी केला आहे.

# पहिल्याच सामन्यात भारताचा दणदणीत विजय

## शिखर धवन व शुबमन गिल यांची विक्रमी भागीदारी, यजमान झिम्बाब्वेचे सपशेल लोटांगण...

आधुनिक केसरी न्यूज


हरारे : गोलंदाजांच्या उल्लेखनीय कामगिरीनंतर शिखर धवन व शुबमन गिल या जोडीने भारताला विजय मिळवून दिला. झिम्बाब्वेने विजयासाठी ठेवलेले १९० धावांचे लक्ष्य या दोघांच्या दमदार खेळीमुळे भारताने १० विकेट्स राखून सहज पार केले. या दोघांनी २१ वर्षांपूर्वीचा मोठा विक्रमही मोडला. सहा महिन्यांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पुनरागमन करणाऱ्या दीपक चहरने कहर करताना झिम्बाब्वेला सुरुवातीलाच हादरवून टाकले. त्यानंतर प्रसिद्ध कृष्णा, अक्षर पटेल व मोहम्मद सिराज यांनी धक्कातंत्र कायम राखताना यजमानांना हतबल केले. पण, रिचर्ड एनगाराव्हा व ब्रॅड इव्हान्स यांनी ९व्या विकेटसाठी विक्रमी भागीदारी करून भारतासमोर आव्हानात्मक लक्ष्य उभे केले. चहरने २७ धावांत ३, कृष्णाने ५० धावांत ३ आणि पटेलने २४ धावांत ३ विकेट्स घेतल्या. सिराजने एक विकेट घेतली. प्रत्युत्तरात, शिखर धवनने मोठा विक्रम केला.

रिचर्ड एनगाराव्हा व ब्रॅड इव्हान्स या जोडीने ९व्या विकेटसाठी ४९ चेंडूंत अर्धशतकी भागीदारी करून झिम्बाब्वेचा डाव सावरला. भारताविरुद्धची झिम्बाब्वेच्या ९व्या विकेटही केलेली ही वन डेतील सर्वोत्तम भागीदारी ठरली. यापूर्वी १९९८मध्ये पी स्ट्रँग व ए व्हायटल यांनी ५३ धावांची भागीदारी केली होती. ७० धावांची ही भागीदारी कृष्णाने तोडली. त्याने एनगाराव्हाला त्रिफळाचीत केले. झिम्बाब्वेच्या फलंदाजाने ४२ चेंडूंत ३ चौकार व १ षटकारासह ३४ धावा केल्या. झिम्बाब्वेचा संपूर्ण संघ ४०.३ षटकांत १८९ धावांत माघारी परतला. चहर, कृष्णा व पटेल यांनी प्रत्येकी तीन विकेट्स घेतल्या.

१९० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना शिखर धवनने पहिल्याच षटकात दोन खणखणीत चौकार खेचले. त्यानंतर शुबमन गिलसह त्याने भारताच्या धावांचा ओघ कायम राखला. या दोघांनी १० षटकांत ४३ धावा जोडल्या आणि धवनने एक पराक्रम केला. वन डे क्रिकेटमध्ये भारताकडून त्याने ६५०० धावा पूर्ण केल्या. सलामीवीर म्हणून हा टप्पा ओलांडणारा तो भारताचा पाचवा ओपनर ठरला. सचिन तेंडुलकर, सौरव गांगुली, रोहित शर्मा व वीरेंद्र सेहवाग हे आघाडीवर आहेत.

शिखर धनने मागील २२ डावांतील ११ वे अर्धशतक पूर्ण केले, तर गिलने मागील ४ डावांतील तिसरे अर्धशतक झळकावले. या दोघांनी वन डे क्रिकेटमध्ये मागील ४ सामन्यांत तिसऱ्यांदा शतकी भागीदारी केली. धवन ११३ चेंडूंत ९ चौकारांसह ८१ धावांवर नाबाद राहिला, तर गिलनेही ७२ चेंडूंत १० चौकार व १ षटकारांसह नाबाद ८२ धावा केल्या. या दोघांनी १९२ धावा करताना भारताला १० विकेट्स राखून विजय मिळवून दिला. झिम्बाब्वेविरुद्धची वन डे क्रिकेटमध्ये सलामीवीरांनी केलेली ही सर्वोत्तम भागीदारी ठरली. यापूर्वी सौरव गांगुली व सचिन तेंडुलकर यांनी २००१ मध्ये १३३ धावांची भागीदारी केली होती.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# तुफानातील दीप : डॉ. टायरॉन हेज

आधुनिक केसरी

प्रयोगशाळेतच बेडकांचे निरीक्षण करण्यापेक्षा त्यांनी प्रत्यक्ष निसर्गात जाऊन आपल्या संशोधनाची पुष्टी करायचे ठरवले. त्यातही त्यांना आपले आधीचे निष्कर्षच बरोबर असल्याचे आढळून आले. त्यांनी मग हेच प्रयोग उंदरांवर करून पाहायचे ठरवले. या उंदरांवरील प्रयोगातून धक्कादायक निष्कर्ष त्यांच्या हाती आले. त्यातून त्यांना कळले की माणसाच्या शरीरात जर अट्रॅझिनयुक्त पाणी गेले तर पुरुषांना प्रोस्टेटचा कर्करोग आणि स्त्रियांना स्तनाचा कॅन्सर होऊ शकतो. कॅन्सरचे अलीकडे वाढलेले प्रमाण ही बाब अधोरेखित करते. यातील आश्चर्याची गोष्ट अशी की स्त्रियांच्या स्तनाच्या कर्करोगावरील उपचारासाठी वापरल्या जाणाऱ्या एका औषधाची निर्मिती ही सिंजेटा कंपनीच करीत होती. म्हणजे अट्रॅझिनच्या विक्रीतून नफा कमावणे आणि त्याच्याच वापरातून निर्माण होणाऱ्या कर्करोगावरील औषध उत्पादन करून त्यातूनही नफा कमावणे असा दुहेरी खेळ ही कंपनी खेळत होती.

टायरॉन यांनी कंपनीचे हे रूप जगासमोर आणून कंपनीला उघडे पाडण्याचा प्रयत्न केला. कंपनीने मग अतिशय खालची पातळी गाठून डॉ टायरॉन यांचे वैयक्तिक चारित्र्यहनन करण्याचा प्रयत्न केला. पण डॉ टायरॉन आपल्या सिद्धांतांवर ठाम होते. ते कोणत्याही आमिषांना, दडपणाला बळी पडले नाहीत. अमेरिकेतील पाणीपुरवठा करणाऱ्या पंधरा कंपन्यांनी सिंजेटा आणि अट्रॅझिन उत्पादन करणाऱ्या कंपन्यांविरुद्ध न्यायालयात दावा ठोकला. या न्यायालयाने अट्रॅझिन निर्माण करणाऱ्या कंपन्यांना जबर दंड ठोठावला. एक प्रकारे डॉ टायरॉन यांचा हा विजय होता.

डॉ टायरॉन यांचा लढा आजही सुरूच आहे. त्याचे सुपरिणाम दिसत आहेत. अमेरिकेतील पर्यावरण संरक्षण विभागाने अट्रॅझिनच्या वापरावर काही निर्बंध लादले आहेत आणि त्याच्या वापराचा पुनर्विचार सर्वांनी करावा असे आवाहन केले आहे.

डॉ टायरॉन तरुणांना दिलेल्या आपल्या संदेशात म्हणतात, ' विज्ञान ही सत्यापर्यंत पोहोचण्याची प्रक्रिया आहे. वैज्ञानिक होणं ही फक्त करिअरची संधी नसून जीवनाचा घेतलेला शोध आहे, सत्याकडे होणारी वाटचाल आहे. ' ते पुढे म्हणतात, ' माझ्या जडणघडणीत माझ्या आईवडिलांच्या संस्कारांचा मोठा वाटा आहे. वडिलांनी मला शिकवलं आहे की काही बक्षीस मिळेल या आशेने योग्य गोष्ट करू नको आणि काहीतरी शिक्षा होईल या भीतीने अयोग्य गोष्ट करण्याचे टाळू नको. तात्पर्य म्हणजे एखादी गोष्ट करणे जर योग्य असेल तर ती योग्य आहे म्हणूनच कर. बक्षिसाच्या किंवा कोणी चांगले म्हणेल म्हणून करू नको. आणि एखादी गोष्ट करणे अयोग्य असेल तर भीतीपोटी ती टाळण्यापेक्षा ती अयोग्यच आहे म्हणून करू नकोस. '



## आनंदी पहाट

# मनातील भाव-भावना प्रकट होणे महत्वाचे

आधुनिक केसरी

अत्याधुनिकीकरण आणि काही प्रमाणात अंधानुकरण यामुळे एकूणच आपल्या राहणीमानात बरेच बदल होत असतात. हे होणारे बदल एका अर्थी आपला विकासच घडवत असतात. आपले केवळ नीटनेटके राहणे हे पुरेसे नसून आपण चारचौघांमध्ये वेगळे आणि आकर्षक दिसणे आवश्यक झाले आहे. मुळातच सुंदर असणे आणि आकर्षक दिसणे या दोन्ही गोष्टी जरी सौंदर्याची अनुभूती देणाऱ्या असल्या, तरीही केवळ सुंदर असणे सुद्धा पुरेसे नसून आकर्षक दिसणे आणि त्यासाठी नीटनेटके राहणे आवश्यकच असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

यामुळेच सुंदर असण्यापेक्षाही सुंदर दिसण्यासाठी काहीजणांचा कल असतो. या अशा सुंदर आणि आकर्षक राहणीमानासाठी निश्चितच मानसिककदृष्ट्या काही बाबी करणे अनिवार्य असते. ह्या राहणीमानाची नुसती सवय होऊन चालत नाही, तर असे राहणीमान टिकवून ठेवण्यासाठी थोडाफार खर्चही करावा लागणे स्वाभाविक असते. “आपले मन” या शब्दांमधूनच आपल्या स्वतःच्या मनाविषयीच्या भाव-भावना प्रकट होत असतात. आपल्याला आपल्या स्वतःच्या मनाची असलेली ऊब आणि त्यामुळेच निर्माण झालेलं आपल्या जागाबरोबरचं नाते अतूट असते. आपण शरीराने आपल्या घरापासून दूर असतो तेव्हा देखील आपल्या मनात आपले घर हे घर करून राहीलेले असते. हि घरघर प्रत्येकाच्या जीवनाचा अविभाज्य घटक असल्याप्रमाणे अनुभवली जात असते. आपले मन आणि धन एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्यासारख्या असतात. आपल्या मनातले धन आणि धनाढ्य मन तसेच मनातले घर आणि घरातले मन या दोन्हींचा मेळ आपण घालू शकलो पाहिजेत. आपले प्रत्येक स्वप्न साकार होताना आपल्याला मिळणारा आनंद निश्चितच निराळा असतो. पण ही स्वप्न साकारण्यासाठी आपल्या मनाची यथायोग्य मशागत करणेही तितकेच जरुरीच असते.



आधुनिक केसरी

## उध्दार जीवाचा | हरिपाठ ||

जयाचे अंगणी | चंदनाचे झाड ||
परी नाही चाड | सुगंधाची ||१||

परीसाची खाण | गुणांची अंतरी ||
संगतीने परी | घात केला ||२||

मुखी नाही नाम | नाही केली वारी ||
गाथा ज्ञानेश्वरी | वाचली ना ||३||

ऐशा नरा कैसी | व्हावी उपरती ? ||
जेणे जागवीती | मुळ बुध्दी ||४||

नर नारायण | जाण अंतरीचा ||
उध्दार जीवाचा | हरिपाठ ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## “निरुपण”


आधुनिक केसरी

**मुग्धामुहुर्विदधतीवदने मुरारेः**
**प्रेमत्रपाप्रणिहितानिगतागतानि ।**
**मालादृशोर्मधुकरीवमहोत्पले या**
**सामे श्रियं दिशतु सागरसम्भवायाः ॥२॥**


जसे भृंगी महान कमलपत्रावर येऊन जाऊन राहते, तिथे भ्रमत असते, तसे मुरारी श्रीहरीच्या मुखकमलाकडे वारंवार प्रेमपूर्वक जाते आणि लज्जेमुळे परत फिरते, अशा सागरकन्यका लक्ष्मीची मनोहर मुग्ध दृष्टीमाला मला धनसंपत्ती प्रदान करो. ||२||



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर




## ।। दासबोध स्तवन ।।



# सृष्टीकथन

आधुनिक केसरी

मित्रांनो आपण हया समासात काय शिकलो असं जर कोणी विचारले तर मी तर म्हणेन की "चराचरात विश्व सामावले आहे. आणि या विश्वाचा कर्ता जगत्नियंता आहे तो आपल्याला धर्म, अर्थ,काम,मोक्ष,सहकार्य, मानवीमुल्यांचं रक्षण करून जगावं असा संदेश देत आहे असं मला वाटतं. समासाच्या शेवटाकडे येत असताना समर्थांनी 54 व्या ओवीतही हेच सांगितले आहे की मानवी जन्माला आलो आहोत तर सगुणोपासनेच्या आधाराने निर्गुणापर्यन्त पोहचता येते. ही गोष्ट खरी आहे. पण त्यासाठी तुमच्याकडे कोणत्याही बाबतीत सारासार विचार करण्याची बुद्धी असली पाहिजे व सतत सगुणोपासनेत राहिले पाहिजे. सतत सत्संग केला पाहिजे. म्हणजेच माणूस कितीही अज्ञानी असो आणि आत्मस्वरूप कितीही निर्गुण असो सगुणोपासना,सारासार विचार, सत्संगती या तिन्हीच्या आधारे तो आत्मज्ञानी होऊ शकतो असे समर्थांचे स्पष्ट मत आहे. सगुणोपासनेच्या आधाराने ज्ञान मिळवा पण ते ज्ञान स्वतः च्या कल्याणासाठी, कुटुंबाच्या कल्याणासाठी, व समाजाच्या कल्याणासाठी असले पाहिजे हे प्रत्येकाने लक्षात ठेवणे गरजेचे आहे. खरे काय खोटे काय हे समजले पाहिजे दंभाचार,लबाडी, फसवणूक, गैरमार्गाने जाणेअशा वाईट मार्गाने जाणे टाळले पाहिजे. सन्मानाने सन्मार्गाची कास धरून जीवन जगले पाहिजे. "जीवभूत सनातन"म्हणजे या संसारात माझाचं म्हणजेच परमात्म स्वरूपाचा सनातन जीव झाला आहे या गीतेच्या वचनावर विश्वास ठेऊन मानवी जीवनाची कास धरली पाहिजे. सगुणाचे रक्षण करावे,सगुणोपासना धरावी.हा संदेश समर्थ आपल्याला देतात.त्याचे अनुकरण तुम्ही व मी केले पाहिजे किंवा मी तर म्हणेन की ही आपली जबाबदारी आहे आणि राम नामाच्या जप सामर्थ्याने आपण ती जबाबदारी पार पाडुयात.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# कृष्णं वंदे जगतगुरु

आधुनिक केसरी

**यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।**
**अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥**

या पृथ्वीवर जेव्हा जेव्हा अधर्म वाढतो तेव्हा अधर्माच्या विनाशासाठी मी अवतार घेतो. मानव आणि परमेश्वर यात फरक हाच की येणे-जाणे मानवाच्या हाती नसते, ते परमेश्वराच्या हाती असते.

व्दापारयुगातील हेच ते दिवस. जेव्हा श्रावण सरींनी ही धरणीमाताच काय पण झाडे-वेली, पशुपक्षी सारेच आनंदले होते. पण चिंतेत होते ते मात्र वसुदेव. ते रात्रीच्या अंधारात नुकत्याच जन्मलेल्या बाळाचा जीव मामा कंस याच्यापासून वाचविण्याकरिता, बाळाला टोपलीत ठेवून यमुनेतील पाण्यातून वाट शोधत होते. यमुनाही जिद्दीपणाने वसुदेवांची परिक्षा बघत होती. यमुनेचे पाणी डोक्यापर्यन्त चढू लागताच वसुदेवाने टोपली डोक्यावर घेतली. संकटाच्या लाटानी टोपली हेलखावे खात होती. वसुदेव प्राणपणानी बाळाला सुरक्षित ठेवण्यासाठी धडपडत होते. अधर्मा विरुद्ध धर्माला वाचवणे हे अवघडच. अखेर यमुनेच्या पाण्याने बाळाचा चरणस्पर्श केलाच. मगच संतुष्ट होत यमुनेने वसुदेवाला वाट मोकळी करुन दिली.

भारतीय संस्कृती ज्यांच्यावरील विश्वासू श्रद्धेने सुखेनैव वाटचाल करते त्या योगेश्वर श्रीकृष्णाचा आज जन्मदिवस.. अर्थात जन्माष्टमी. धर्म सर्वप्रथम




वाचविण्याचा पहिला प्रयत्न केला तो वसुदेव-देवकीने आपल्या अपूर्व त्यागाने. श्रीकृष्ण चरित्र विस्मयकारी. अधर्माच्या विनाशासाठी चक्क कारावासात जन्म घेतला. जन्मतःच जन्मदात्रीला सोडावे लागले. तुमच्या आमच्या जीवनात श्रीकृष्ण चरित्र म्हणजे चैतन्याचा ठेवाच. परिस्थिती कशीही असो तुम्हाला भगवान श्रीकृष्णाचे अलौकिक जीवन मार्गदर्शक ठरणारच. जनसामान्य असो वा मानवी अवतारातील परमेश्वर, सगळ्यांना सुखदुःख भोगाचा सामना करावाच लागणार, पण तरीही हा सामना कसा करावा हे सांगणारे श्रीकृष्ण चरित्र. यामुळेच हजारो वर्षे श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव जगभरात उर्जा निर्माण करतो.

आज भाविक मनाने पुन्हा गोकुळात प्रवेश करणार. श्री कृष्णाच्या लीला अनुभवणार. भारतीयांच्या जीवनात कृष्णाशी भावनिक नाते आहे. जेव्हा प्रत्येक घरात बालकाच्या येण्याचाही आनंद साजरा होतो, तिथे प्रत्यक्ष श्रीकृष्णाच्या जन्माचा जल्लोश तर आगळाच.. आपण सर्वांना 'कृष्ण जन्माष्टमीच्या' शुभेच्छा.. !!

**अजन्मा जन्मासी आला**
**कारागारी अंधकारी**
**कृष्णजन्म झाला**
**देवदुर्लभा सती देवकी**
**तिच्या तनूची करून पालखी**
**अनंत आले मानवलोकी**
**प्रसव-व्यथेवीण उरी होता तो,**
**उदरी अवतरला**
**'सोहं सोहं' नाद उमटता**
**वळुनी कवळी देवकिमाता**
**फुटला पान्हा, बघता तान्हा**
**तुटे शृंखला बंधनातुनी,**
**मोक्ष करी आला**
**बाहेरून तो गर्जे वारा**
**नाचू लागल्या श्रावणधारा**
**भिजली दारे भिजल्या कारा**
**झडली कुलुपे कड्या उघडल्या,**
**बंदीवास सरला**

**-ग. दि. माडगूळकर**

# अखेर वादग्रस्त अकार्यक्षम पोलिस उपअधीक्षक सुनिल जायभायेंची अकार्यकारी पदावर हकालपट्टीची गृहमंत्र्यांची घोषणा

आधुनिक केसरी न्यूज

**सुनिल सिरसाट**

**अंबाजोगाई :** येथे उपविभागीय अधिकारी म्हणून रुजू झाल्याच्या पहिल्या दिवसापासून सातत्याने वादग्रस्त ठरलेले अकार्यक्षम पोलीस उपविभागीय अधिकारी (DySp) सुनिल जायभाये यांची अखेर अकार्यकारी पदावर हकालपट्टी करण्यात येणार असल्याची विधीमंडळ सभागृहात घोषणा करण्यात आली आहे.

**कर्तव्यदक्ष आ.नमिता मुंदडा यांच्या लक्षवेधीची तात्काळ दखल घेत उपमुख्यमंत्र्यांची थेट कारवाई**

केज विधानसभा मतदारसंघाच्या लोकप्रिय आणि कर्तव्यदक्ष आ.सौ.नमिता अक्षय मुंदडा यांच्या तक्राररुपी लक्षवेधीची उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ दखल घेऊन अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक वासुदेव मोरे यांना निलंबित करण्याची घोषणा केली. तर या अशा अधिकाऱ्यांना सातत्याने पाठीशी घालणाऱ्या आणि वेळप्रसंगी मदत करणाऱ्या सातत्यपूर्ण वादग्रस्त ठरलेल्या उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील जायभाये यांचीही अकार्यकारी पदावर हकालपट्टी करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली असून ही कारवाई एवढ्यावरच थांबणार की, यापुढे जाऊनही काही महत्त्वपूर्ण बाबी उघडकीस येण्यासाठी या दोन्ही अधिकाऱ्यांची चौकशी (D.E.Open) केली जाणार हे अजून तरी गुलदस्त्यातच आहे.

अंबाजोगाईतील डॉ.यादव प्रकरण, दलित मुलीचे ॲट्रॉसिटी प्रकरण, माजलगावचे स्वतःच्याच कर्मचाऱ्यास शिवीगाळ-तोडफोड प्रकरण असेल की करुणा मुंडे-बबन गित्ते, परळीतील ऐका शिक्षिकीचे विनयभंग-ॲट्रॉसिटी प्रकरण यांसह अन्य वादग्रस्त प्रकरणे असतील....., अशा प्रत्येक प्रकरणात कुठल्या न कुठल्या वादग्रस्त मुद्दाने चर्चेत राहत सातत्याने बीड जिल्हा पोलीस




प्रशासनाच्या बदनामीस कारणीभूत ठरलेले मायामोही उपविभागीय पोलिस अधिकारी सुनिल जायभाये हे पक्षपाती राज्यकारभा-यांचे ऐकुन आपला कारभार एकलहाती हाताळून कधी.... कधीच सर्वसामान्य तक्रारदारांचे वाली ठरले नाहीत. उलट ते कायम वजनदार राजकीय व मालदार धनदांडग्यांचे भालदार होते. अशीच चर्चा सध्या परळी-अंबाजोगाई-माजलगावसह ईतर भागात सर्वत्र सुरू असुन बरे झाले ते गेले.....! असाही सुर कानी पडत आहे. आ.नमिता मुंदडांनी मोठे काम केले अशीही कुजबूज कानावर पडत आहे.

**सुनिल जायभाये हे वरिष्ठांसाठी असून अडचण नसून खोळंबा....!**

हे वादग्रस्त पोलीस उपाधिक्षक सुनिल जायभाये विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांसोबत फोटोसेशन करून वाटसप-फेसबुकवर टाकायचे. आणि त्यातून मी राजकीय दृष्ट्याही खुप मोठा आहे. मग या वरदहस्ताने मला वरिष्ठ अधिकारी सुद्धा काहीच करू शकत नाहीत. अशाच काहीशा आविर्भावात वावरायचे. त्यामुळे त्यांचे अप्पर पोलीस अधीक्षक सौ.कविता नेरकर-पवार, तत्कालीन पोलीस अधीक्षक आर. राजा आणि कुमावत यांच्या पथकासोबतही फारसे जमत नव्हते अशीही माहिती नाव न छापण्याच्या अटीवर पोलीस दलातीलच सूत्रांकडून आता सांगितली जात आहे. त्यामुळे हे डी.वाय.एस.पी महाशय वरिष्ठांसाठी सुद्धा असून अडचण नसून खोळंबा असल्याचे आता बोलले जात आहे.

**महत्वपुर्ण प्रश्न लक्षवेधीत मांडणाऱ्या सभागृहातील अव्वल क्रमांकावर असणाऱ्या आमदार म्हणून नमिता मुंदडा यांचा लौकिक**

मतदार संघातील प्रत्येक हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवून असणाऱ्या दक्ष आमदार या अशा कुठल्याही प्रश्नावर अगदी अभ्यासपूर्वक मांडणी करत असतात आणि मग जे प्रश्न स्थानिक पातळीवर सुटत नाहीत. अशा प्रश्नांवरती त्या मग थेट सभागृहात लक्षवेधी स्वरूपात मांडणी करत असल्याने महाराष्ट्र विधीमंडळ सभागृहात सातत्याने अत्यंत महत्त्वाच्या आणि निकडीच्या प्रश्नांवरती बोलणाऱ्या एकमेव कमी वयातील आमदार म्हणून त्यांनी अलीकडच्या काळात महाराष्ट्रात नावलौकिक मिळवलेले आहे. आणि मग याच धरतीवर पोलीस प्रशासनातील हे दोन अधिकारी फारच मनमानी करू लागल्याने आणि सर्वसामान्यांना त्रासदायक ठरू लागल्याने नव्या सरकारच्या सुरू असलेल्या अधिवेशनात काल आ. नमिता मुंदडा यांनी लक्षवेधीत मोरे-जायभाये यांच्या तक्रारींचा पाढा वाचून संपूर्ण हकीकत लक्षवेधी स्वरूपात मांडली आणि मग अगदी कमी वयात-अनुभवात या कामदार-दमदार आमदारांचे जोरदार काम उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना चांगलेच ठाऊक असल्याने आपण शक्यतो सभागृहात कुणाला निलंबित करत नाहीत. कुणाची हकालपट्टीही करत नाहीत. परंतु आ.नमिता मुंदडा यांचे काम पाहता त्यांनी केलेल्या तक्रारीची दखल घेऊन कसलाही विलंब न करता गृहमंत्र्यांनी वासुदेव मोरे यांचे निलंबन व सुनिल जायभाये यांची तात्काळ बदली (हकालपट्टी) करणार असल्याचे घोषित करुन मांडलेल्या लक्षवेधीला न्याय दिला.

विशेष म्हणजे हे करताना गृहमंत्र्यांनी पोलीस उपाधीक्षक सुनिल जायभाये यांनी आपल्या या वादग्रस्त कार्यकाळात सर्वसामान्य जनतेला (लोकांना) कधी समजून न घेतल्यामुळे त्यांना अकार्यकारी म्हणजेच थेट जनतेशी (लोकांशी) संपर्क-संबंध न येणा-या पदावर पाठवल्याने दोन्ही बाजूंचा योग्य न्याय केला. तो असा की, जायभाये यांना वैतागलेल्या जनतेची व पोलिस कर्मचाऱ्यांची सुटका झाली. तर काही कालावधी पुरते का होईना जनमाणंसांशी संपर्क येणार नाही याची दक्षता घेऊन जायभाये यांची अकार्यकारी पदावर पाठवून जायबंदी करून आ.नमिता मुंदडा यांनी ऐका दगडात दोन पक्षी मारल्याची चर्चा संपूर्ण केज मतदारसंघासह परळी व माजलगाव शहरामध्ये ऐकावयास मिळत आहे.

परंतु अशा अधिकाऱ्यांची केवळ बदली करून भागत नाही तर त्यांची डी.ई. ओपन करून चौकशी केली पाहिजे आणि त्यातून येणारे सत्य बाहेर पडताच अशांवरती योग्य ती कारवाई करून पोलीस खात्याची होणारी बदनामी टळली पाहिजे. याची पुरेपूर काळजी घेत या अशा मूठभर पोलीस अधिकाऱ्यांच्या कर्माने पोलीस धर्म जर बदनाम होत असेल, अडचणीत येत असेल तर मात्र खोलात जायला काय हरकत आहे.....??? असाही प्रश्न मायबाप जनता या ठिकाणी विचारत असून नव्याने आलेले अत्यंत अभ्यासू-दबंग असे पोलीस अधीक्षक नंदकुमारजी ठाकूर यामध्ये जातीने लक्ष घालणार का....? सर्वसामान्यांची मागणी तथा आवाज ऐकून घेऊन ते योग्य त्या मागणीस दाद देतील का.....?? हे पण पाहणे या ठिकाणी आवश्यक वाटते.....!!.

# राज्यपाल कोश्यारी आज अंबाजोगाई-परळीत

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी हे उद्या शुक्रवारी (दि.१९) बीड जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. शुक्रवारी दुपारी अंबाजोगाईत येणार असून परळीत मुक्कामी थांबणार आहेत.

शुक्रवार दि.19 ऑगस्ट 2022 रोजी सकाळी 11.15 वाजता लातूर येथून अंबाजोगाई जि. बीडकडे प्रयाण. दुपारी 12.00 वाजता शासकीय वाहनाने शासकीय विश्रामगृह ता.अंबाजोगाई येथे आगमन व जिल्हा सैनिक कल्याण मंडळ व रेडक्रॉस सोसायटी यांच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठकीसाठी राखीव. दुपारी 1.30 ते 3.00 पर्यंत ही वेळ भोजनासाठी राखीव. तर दुपारी 3.00 वाजता शासकीय विश्रामगृह, अंबाजोगाई येथून योगेश्वरी देवी मंदिराकडे प्रयाण. योगेश्वरी दर्शनानंतर मंदिरातच दुपारी 3.15 वा राखीव. दुपारी 3.15 वा.नंतर शासकीय वाहनाने परळीकडे प्रयाण. दुपारी 4.20 वाजता परळी वैजनाथ मंदिर,



परळी येथे आगमन व दर्शनासाठी राखीव. दुपारी 4.40 वाजता परळी वैजनाथ मंदिर येथून शासकीय विश्रामगृह परळीकडे प्रयाण. दुपारी 4.45 वाजता शासकीय विश्रामगृह परळी येथे आगमन राखीव व मुक्काम. शनिवार, दिनांक 20 ऑगस्ट 2022 सकाळी 9.00 वाजता शासकीय विश्रामगृह, परळी जिल्हा बीड येथून लातूरकडे प्रयाण. अशाप्रकारे या राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचा दौरा असुन जिल्हाधिकारी-पोलिस अधीक्षक स्वतः सोबत राहणार असून कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे.

# पिशोर सोसायटीत बाळासाहेब जाधव यांचे वर्चस्व

## स्व. रायभान जाधव विकास आघाडीचा दारूण पराभव

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** तालुक्यात प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या पिशोर विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या निवडणुकीत स्व. रायभान जाधव विकास आघाडी व माजी चेअरमन नारायण जाधव यांचे पॅनलचा दारूण पराभव करून सरपंच बाळासाहेब जाधव व ॲड.कृष्णा जाधव यांचे शिव सिद्धेश्वर शेतकरी विकास पॅनलने या निवडणुकीत दणदणीत विजय प्राप्त केला. विजयी उमेदवारांमध्ये ॲड.कृष्णा जाधव, प्रताप विष्णू जाधव, अशोक रामराव जाधव, सुदर्शन पंढरीनाथ चौंधे, सखाराम नारायण जाधव, संजय शहाजी जाधव, तेजराव नामदेव निकम, अरबाज एजाज खान पठाण, पंचफुला सुदाम जाधव, लताबाई राजेंद्र जाधव, रवींद्र दिलीप नवले, विठ्ठल फकीरराव ढगे आणि उत्तम रंभाजी वाघ ई. असून या निवडणुकीसाठी वाल्मीक जाधव, वामन विष्णू जाधव, स्वप्निल जाधव, किशोर जाधव, दिलीप जाधव, दिलीप आप्पा नवले, एजाज पठाण तसेच बाळासाहेब जाधव मित्रमंडळाचे वतीने परिश्रम घेण्यात आले. बाळासाहेब मित्रमंडळाच्या वतीने सर्व मतदारांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले.




# ज्या देशात सामाजिक आणि आर्थिक समानता नाही, त्या देशात लोकशाही नाही : उत्तमराव खोब्रागडे

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** लोकशाही म्हणजेच स्वातंत्र्य आणि ज्या देशात सामाजिक आणि आर्थिक समानता नाही, त्या देशात लोकशाही नाही असे प्रतिपादन होल्डिंग हँड्स बहुउद्देशीय संस्थेने महात्मा गांधी स्मारक निधी हॉलमध्ये आयोजित केलेल्या लोकशाही या विषयावर बोलताना माजी भाप्रसे उत्तमराव खोब्रागडे यांनी केले.

लोकशाही टिकवायची असेल तर जनतेने आपले धर्म आणि देव हे घरातच ठेवावे त्याला बाहेर राहू नये असे सांगत संवेधानिक नीतिमत्ता आजच्या राजकारणामध्ये नाही. त्यांच्यातील नीतिमत्ता जगली पाहिजे, त्यांच्यात नैतिकता निर्माण झाली पाहिजे, यासाठी जनतेचा धाक निर्माण करणे गरजेचे आहे. यासाठी जनता जागृत असायला हवी, असे आवाहन उत्तमराव खोब्रागडे यांनी केले. अध्यक्षीय भाषणात डॉ ऋषिकेश कांबळे यांनी बोलताना सांगितले की विरोधी सदस्यांचा पण सन्मान करून प्रशासन करता आलं पाहिजे, ही समृद्ध लोकशाही. आपला देश बहुभाषिक, विविध संस्कृती, वेगवेगळ्या जाती धर्माचे लोक असल्याने त्यांना जोडणे खूप कठीण काम होते. डॉ बाबासाहेब आंबेडकर नसते तर १९८० -८५ पर्यंत कमीत कमी देशाचे चार ते पाच तुकडे झाले असते. विरोधी सदस्यांचा पण सन्मान करून प्रशासन करता आलं पाहिजे, ही समृद्ध लोकशाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी अध्यक्षीय पद्धती आणि संसदीय पद्धतीचा मध्य साधला आणि भारताला समाजवादी लोकशाही अर्पण केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जगभरातील लोकशाहीचा अभ्यास करून आपल्या देशातील स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या आधारावर आपल्याला लोकशाही दिली, असे प्रतिपादन आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. ऋषिकेश कांबळे यांनी दिली.

होल्डिंग हँड्स बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश सिरसीकर यांनी पाहुण्यांचे संस्थेचे मानचिन्ह देऊन स्वागत केले. प्रा. सिद्धार्थ पानवले यांनी कार्यक्रमाचं सूत्रसंचालन केले तर उपाध्यक्ष रवींद्र बनकर यांनी प्रास्ताविक केले. आभार प्रदर्शन सुरेखा कलबुर्गे यांनी केले. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश सिरसीकर, उपाध्यक्ष रवींद्र बनकर लोक विकास बँकेचे अध्यक्ष जे के जाधव, संस्थेचे मुख्य समन्वयक अण्णा वैद्य, महात्मा गांधी स्मारक निधीचे मच्छिंद्र गोरडे, जिल्हाध्यक्ष वर्षा जैन, किरण वनगुजर, मंगला महाजन, सुरेखा कलबुर्गे, उमेश डोंगरे, प्रमिला कुलकर्णी, अजय जोशी, सस्मिता डोंगरे, सुनील मगरे, महेश सिरसीकर, संध्या शिंगारे, प्राची सिरसीकर, अंजली सिरसीकर, अविनाश वाघमारे, अविनाश मुगळीकर, इंद्रकुमार जेवरीकर, शैलेश झनके आणि इतर अनेक जन या परिसंवादात उपस्थित होते.



# ऑस्करची माफी ?

आधुनिक केसरी

चित्रपटांच्या जगतात परमोच्च मानला जाणारा ऑस्कर पुरस्कारांचा सोहळा मराठी माध्यमांच्या ज्ञातकाळापासून 'देखणा' आणि 'दिमाखदार' या विशेषणांनी रंगला. कारण दिसणाऱ्या झळाळीमागच्या किंचितशा काळोखीचे संदर्भही आपल्याला उपलब्ध नव्हते. उदारीकरणाच्या दशकात अमेरिकनांइतकाच इतर देशीयांनाही अधिक जवळ करणाऱ्या या सोहळ्यातील एक कटू इतिहासपान नुकतेच पुन्हा उघडले गेले. मार्लेन ब्रॅण्डो या अभिनेत्याची सर्वोत्तम अभिनेता म्हणून घोषणा झाली, त्यानंतरच्या काही मिनिटांत घडलेल्या नाट्याची आणि त्यानंतर उडालेल्या वादाची झळ आयुष्यभर भोगाव्या लागलेल्या सशीन लिटिलफेदर या कलावतीची तब्बल ५० वर्षांनी ऑस्कर अकादमीने माफी मागितली. माफी आणि पुढील महिन्यात अकादमीने त्याबाबत आयोजित केलेल्या कार्यक्रमाची घोषणा जगभरातील माध्यमांचा विषय बनली आहे. अमेरिकी गौरवर्णीय आई आणि मूळ रेड इंडियन पिता अशा कुटुंबात जन्मलेली सशीन लिटिलफेदर ही एत्तद्देशीय अमेरिकी रहिवाशांच्या हक्कांसाठी लढणारी तरुण कार्यकर्ती म्हणून त्यावेळी परिचित होती. तिने दोन चित्रपटांमध्येदेखील भूमिका मिळविल्या होत्या. पण १९७३ सालच्या ऑस्कर सोहळ्यात ६० सेकंदाचे तिने केलेले भाषण जगभरात तिची छबी पोहोचविणारे ठरले. सोहळ्यात तिला टाळ्यांचा पाठिंबा आला, त्याहून अधिक अवहेलना करण्यात आली. तिचे भाषण लक्ष वेधण्यासाठी केले गेलेले नाट्य आहे, अशी टीका झाली. हॉलीवूडच्या चित्रकर्त्या, दिग्दर्शकांच्या फळीने या अभिनेत्रीला वाळीत टाकले. तिचे चारित्र्यहननही झाले. 'गॉडफादर' या चित्रपटात करडा माफिया बनलेल्या मार्लन ब्रॅण्डो या अभिनेत्याला सर्वोत्तम अभिनेत्याचा पुरस्कार मिळाल्याची घोषणा झाली. जेम्स बॉण्डचा ब्रॅण्ड विस्तारणारा रॉजर मूर आणि जगभरातील सौंदर्यपूजकांचे प्रेम बनलेली लिव्ह उलमन यांनी या पुरस्काराची बाहुली घेण्यासाठी मार्लन ब्रॅण्डो यांच्या वतीने व्यासपीठावर दाखल झालेल्या सशीन लिटिलफेदर या तरुणीचे स्वागत केले. या तरुणीने पुरस्काराची बाहुली घेण्याचे नाकारले. त्यानंतर तिने केलेल्या भाषणात 'हॉलीवूडमधील सिनेमा आणि टीव्ही मालिकांमध्ये नेटिव्ह अमेरिकनांच्या केल्या जाणाऱ्या चुकीच्या चित्रणाचा निषेध म्हणून मार्लन ब्रॅण्डो हा पुरस्कार स्वीकारणार नसल्याचे जाहीर केले. त्यावेळी बहुतांश प्रेक्षकांनी या भाषणाची जाहीरपणे अवहेलना केली. सोहळ्यानंतर जॉन वेनसारखा, पडद्यावर न्यायासाठी लढणारा अभिनेता सशीन लिटिलफेदरच्या अंगावर धावून गेला. जॉन वेन यांना रोखण्यासाठी सहा सुरक्षा रक्षकांचा ताफा बोलवावा लागला.

# कॉंग्रेस रक्त दोषामुळे विकलांग होत आहे



प्रकाश महागावकर
संपर्क क्र. 9422007361

आधुनिक केसरी

**राजस्थानचे मुख्यमंत्री, अशोक गहलोत यांनी आरोप केला आहे की, भाजपा भ्रष्टाचारासाठी, पैसा गोळा करण्यासाठी, अंतर्गत सुरक्षा रक्षक दलाचे ट्रक वापरतो. भाजप ज्या-ज्या राज्यात सत्तेत आहे त्या-त्या राज्यातून सुरक्षा दलाच्या ट्रकस्मधून खोके, पेट्या, बॉक्सेस भरून पैसे भाजपा कार्यालयात आणले जातात. न खाऊंगा न खाणे दूंगा म्हणणारे पंतप्रधान वास्तवात आपल्या पक्षाच्या राज्य सरकारांकडून असे ट्रक ट्रक भरून पैशांची मागणी करत असतील किंवा असे पैसे गोळा करत असतील तर पैशांचा वापर कुठे आणि कशासाठी करत असतील हेही अशोक गहलोत यांना माहीत असेलच. जनहित याचिका दाखल करून, पुराव्यांसह सर्वोच्च न्यायालयात हजर राहून हा सगळा प्रकार विषद करण्याचे समन्स बजावले पाहीजे. कॉंग्रेस नेतृत्वाची शिकवण, अपेक्षा तर गहलोत यांनी उघड केल्या नाहीत ना. याच रक्तदोषामुळे कॉंग्रेस सतत पराभूत होत आहे. रसातळाला जात आहे.**

जसे मदरशांमध्ये, मशिदीत धर्मांधतेचे बाळकडू पाजले जाते. मुस्लिमेतर धर्मांचा तिरस्कार शिकवला जातो.

कट्टतावाद आणि 'छीन लो'चा धडा गिरवून घेतला जातो, तसेच भ्रष्टाचाराचे संस्कार कॉंग्रेसच्या रक्तातच भिनलेले असतात.

कोणतेही काम करण्यापूर्वी त्यात आपल्याला किती आणि काय मिळणार याचाच विचार ही मंडळी आधी करतात आणि मग कावीळ झालेल्या माणसाला जग पिवळे दिसते म्हणतात तसे कॉंग्रेसवाल्यांना सगळीकडे फक्त भ्रष्टाचाराचे कुरणच दिसते.

भारतीय राजकीय क्षेत्रात येणारा प्रत्येक जण फक्त खायला, कमवायला आणि लूटायलाच येतो यावर त्यांचा ठाम विश्वास असतो. भारताच्या पाठीवर एकही पक्ष, राजकारणी, नेता, सेवाभावी असू शकतो हे यांना मान्यच नाही. कारण

हे फक्त खातच आलेत, लुटतच आलेले आहेत. परवा राजस्थानचे मुख्यमंत्री, अशोक गहलोत, जे कॉंग्रेस च्या पहिल्या फळीचे, वयस्क, नेहरू गांधी घराण्याच्या जवळचे आणि विश्वासातील, आतील गोटातील नेते आहेत. डावपेचात तरबेज आणि राजस्थानमध्ये बऱ्यापैकी जनाधार असणारे नेते आहेत. आपल्या मार्गात आडवे येणारे, नवीन उभरू पाहणारे नेतृत्व यांना कधीच सहन होत नाही.

ते परवा म्हणाले भाजपा भ्रष्टाचारासाठी, पैसा गोळा करण्यासाठी, अंतर्गत सुरक्षा रक्षक दलाचे ट्रक वापरतो.

भाजप ज्या-ज्या राज्यात सत्तेत आहे त्या-त्या राज्यातून सुरक्षा दलाच्या ट्रकस्मधून खोके, पेट्या, बॉक्सेस भरून पैसे भाजपा





कार्यालयात आणले जातात. मागील बाजूने ट्रक्स लावून हे काळे धन उतरवून घेतले जाते आणि मग हे ट्रकस् निघून गेले की ती रक्कम आत नेली जाते. एवढी खात्रीशीर माहीती अशोक गहलोतकडे आहे तर ते इतकी वर्षे गप्प का बसलेले आहेत. ही तर सुवर्ण संधी आहे कॉंग्रेसकडे भाजपला उघडे पाडायची, बदनाम करण्याची, पराभूत करण्याची. मग ते शांत का आहेत. लगेच भाजपा विरोधात एफआयआर दाखल का करत नाहीत. ही सर्व माहीती ईडीला का कळवत नाहीत पुराव्यांसह. असे असेल तर भाजपाला हरवणे, पराभूत करणे सोपे जाईल ना कॉंग्रेसला.

एवढी सखोल आणि खरी माहीती असूनही अशोक गहलोत सारखा कट्टर भाजप विरोधी नेता गप्प बसतो हे न समजण्या सारखे कोडे आहे.

जर भारतीय जनता पक्ष मोदी-शहांचे नेतृत्वात आपल्या पक्षाचे सरकार असलेल्या राज्यांमधून असे ट्रकस् भरभरून नोटा गोळा करत असतील तर मग केंद्रात तर अक्षरशः ते जहाजे, भरभरून पैसा गोळा करत असतील. भाजपाचे पक्ष कार्यालय अपुरे पडत असेल पैशांचे बॉक्सेस ठेवायला. मग अशोक गहलोत भाजपला जागा उपलब्ध करून देत आहेत काय, गोडावून्स पुरवत आहेत काय? मग एवढे दिवस ते गप्प का आहेत.

कपिल सिब्बल, अभिषेक मनू संधवी, सलमान खुर्शीद असे ऐक से बढकर एक खंदे कायदेतज्ञ हाताशी असताना आणि केंद्र सरकार ईडीचा गैरवापर करून सोनिया गांधी, राहूल गांधी यांच्या विरोधात नॅशनल हेराल्ड, वगैरे केसेसमध्ये ससेमिरा लावत आहे तर मग एवढे चांगले कोलीत हातात असताना गप्प का आहेत. का उगाच काहीतरी बकायचे आणि कार्यकर्त्यांच्या मनात जनतेच्या मनात गोंधळ निर्माण करायचा एवढाच उद्देश आहे. आपण एका मोठ्या आणि सीमेलगतच्या राज्याचे मुख्यमंत्री आहोत, जबाबदार नेते आहोत. कुठे काय बोलावे, बरळावे हे कळायला हवे ना.

का नशेत बरळले. का कल्पना शक्ती चे जोरावर, मनात घोळत असलेली कल्पना व पर्याय भाजपाचे नावावर थोपवून स्वप्नात दिसलेले कांही ते सांगून गेलेत. अशोक गहलोतच यावर प्रकाश टाकू शकतात.

न खाऊंगा न खाणे दूंगा म्हणणारे पंतप्रधान वास्तवात आपल्या पक्षाच्या राज्य सरकारांकडून असे ट्रक ट्रक भरून पैशांची मागणी करत असतील किंवा असे पैसे गोळा करत असतील तर पैशांचा वापर कुठे आणि कशासाठी करत असतील हेही अशोक गहलोत यांना माहीत असेलच.

जनहित याचिका दाखल करून, पुराव्यांसह सर्वोच्च न्यायालयात हजर राहून हा सगळा प्रकार विषद करण्याचे समन्स बजावले पाहीजे. कॉंग्रेस नेतृत्वाची शिकवण, अपेक्षा तर गहलोत यांनी उघड केल्या नाहीत ना. याच रक्तदोषामुळे कॉंग्रेस सतत पराभूत होत आहे. रसातळाला जात आहे. कधीच कोणीच देशाचा विचारच केलेला नसल्याने असले घाणेरडे विचार यांच्या मनात येतात, स्वप्नात येतात आणि मग अस्वस्थ झाल्यावर नशेत नको ते बोलतात आणि आपलेच हसे करून घेतात.

# या प्रदूषणाचं करायचं काय?



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**आपले आयुर्मान कमी होण्यामागे फक्त वायू प्रदूषण हे एकमेव कारण नाही. ध्वनी प्रदूषणामुळे आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण होत आहेत. मातीमध्ये विरघळलेले विष, धान्य, फळे आणि भाजीपालाद्वारे आपल्या शरीरापर्यंत पोहचत आहेत आणि अनेक प्राणघातक रोगांना जन्म देत आहे. पाणी तर स्वच्छ केल्याशिवाय पिता येत नाही कारण आता देशात कुठेही पिण्यायोग्य पाणी राहिलेले नाही. वर्षानुवर्षे नद्यांमधील वाढते प्रदूषण रोखण्यासाठी महत्त्वाकांक्षी योजना चालू आहेत, पण त्यांचा काही विशेष परिणाम होताना दिसत नाही. या सर्व प्रकारच्या प्रदूषणावर नियंत्रण न ठेवण्याचे मुख्य कारण म्हणजे सरकारांची उदासीनता आणि संबंधित विभागांची भ्रष्ट प्रथा.**

हवा, पाणी, माती अशा प्रत्येक ठिकाणी वाढत्या प्रदूषणाबद्दल वेळोवेळी चिंता व्यक्त केली जात आहे. विविध संशोधन संस्था याबाबतीत सतत संशोधन करत असतात आणि त्यांच्या आधारे त्यांचे संशोधन प्रकाशित करत असतात. याच मालिकेतील हेल्थ इफेक्ट्स इन्स्टिट्यूट या अमेरिकेतील संस्थेने केलेल्या संशोधनानुसार जगातील सर्वाधिक प्रदूषित 20 शहरांत दिल्लीसह देशातील तब्बल 18 शहरांचा समावेश आहे. स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करणाऱ्या भारतापुढे हवा प्रदूषणाचे आव्हान कायम आहे.

जगातील सुमारे सात हजार शहरांतील हवा प्रदूषण व त्याच्या जागतिक आरोग्यावरील परिणामाचा सर्वसमावेशक ,विश्लेषणपर अहवाल 'हवेचा दर्जा आणि शहरांचे आरोग्य' या नावाने प्रसिद्ध करण्यात आला आहे. सर्वाधिक प्रदूषित 20 शहरांत सूक्ष्म कण प्रदूषकांची (पीएम 2.5) सर्वाधिक वेगाने होत असलेली वाढ चिंतेची बाब आहे. या शहरांचा 2010 ते 2019 दरम्यानच्या काळातील डेटा तपासण्यात आला.यावेळी पीएम 2.5 आणि नायट्रोजन डायऑक्साईड (एनओ2) या सर्वाधिक घातक प्रदूषकांवर लक्ष्य केंद्रित करण्यात आले. जगभरातील 7 हजार 239 शहरांतील हवेची गुणवत्ता तपासण्यासाठी उपग्रह व मॉडेल्सचा वापर केला. यावेळी 2019 मध्ये पीएम 2.5 कणांमुळे सुमारे 17 लाख मृत्यू झाल्याचे आढळले. आशिया, आफ्रिका, पूर्व आणि मध्य युरोपवर हवा प्रदूषणाचा सर्वाधिक परिणाम होत असल्याचेही निष्पन्न झाले. संशोधकांनी 21 प्रदेशांतील सर्वाधिक लोकसंख्येच्या 103 शहरांवर लक्ष्य केंद्रित केले. यात 2019 मध्ये दिल्लीसह कोलकाता पीएम 2.5 शी संबंधित मृत्यूंच्या प्रमाणात 'टॉप टेन' शहरांमध्ये होते.

महत्त्वाचे म्हणजे 2019 मध्ये 20 पैकी केवळ चार शहरे जागतिक आरोग्य संघटनेचे वार्षिक पीएम 2.5 च्या पाच मायक्रोग्रॅम प्रति घनमीटर या मार्गदर्शक तत्त्वांची पूर्ती करत होते. यात भारतातील एकही शहर नाही. पीएम 2.5 कणांशी सर्वाधिक संपर्क असणारे नागरिक भारत, नायजेरिया,पेरू, बांगलादेश या देशांतील आहेत. पीएम 2.5 मध्ये सर्वाधिक वाढ होणाऱ्या पहिल्या 50 शहरांपैकी 41 भारतातील आहेत तर नऊ इंडोनेशियातील आहेत. विशेष म्हणजे आपल्या शेजारील देश चीनमधील देशातील पीएम 2.5 कणांमध्ये मोठी लक्षणीय घट झाली आहे. प्रदूषण कमी करण्यासाठी चीन अनेक वर्षांपासून प्रयत्न करीत आहे.

असे अनेक अहवाल आणि इशारे देऊन दरवर्षी अनेक अभ्यास प्रकाशित केले जातात, मग असे वाटते की याचा गांभीर्याने विचार करून सरकार या दिशेने काही ठोस व्यावहारिक पावले कधी उचलेल, परंतु



वास्तव हे की इतर माहितीप्रमाणे या अभ्यासाचा डेटा फक्त काही दिवस चर्चेत राहतो आणि नंतर नाहीसा होतो. मात्र हिवाळा आल्यावर दिल्ली आणि इतर काही महानगरांमध्ये प्रदूषण पृथ्वीच्या पृष्ठभागाभोवती दाट होते आणि लोकांचा श्वासोच्छवास वाढायला लागतो तेव्हा कुठे सरकार थोडे फार हात -पाय हलवायला लागते.चीनने मात्र यात चांगली प्रगती केली आहे. आपण त्याच्याकडून काही शिकण्याची गरज आहे.

आपल्या देशात प्रदूषणाची कारणे लपलेली नाहीत, परंतु सत्य हे आहे की सरकारांना ते दूर करण्याची इच्छाशक्ती नाही. केवळ महानगरांमध्येच नाही, तर आता लहान शहरांपासून ते खेड्यांमध्येदेखील हवेचे प्रदूषण प्रमाण पातळीपेक्षा बरेच जास्त राहू लागले आहे. याचे पहिले मोठे कारण म्हणजे वाहनांमधून निघणारा धूर. वाहनांच्या विक्री आणि खरेदीवर नियंत्रण ठेवावे, असा सल्ला अनेक वेळा देण्यात आला आहे. सार्वजनिक वाहने अधिक सुलभ आणि व्यावहारिक बनवा, असे सांगण्यात आले आहे. पण कोणत्याही सरकारने त्याकडे लक्ष दिलेले नाही.

जेव्हा वायू प्रदूषण घातक ठरू लागते, तेव्हा दिल्ली सरकार निश्चितपणे विषम-समान योजना लागू करते. बाकी कुठल्याच मोठ्या शहरांमध्ये याबाबत कसलेच प्रयत्न केले जात नाहीत.


या व्यतिरिक्त वायू प्रदूषणाचे दुसरे प्रमुख कारण कारखान्यांमधील, वीटभट्ट्यांमधून निघणारा धूर आहे. भारतात अजूनही विकसनशील अर्थव्यवस्था आहे, त्यामुळे विकास कामे, औद्योगिक उत्पादन यावर विशेष भर आहे. जरी कारखान्यांसाठी प्रदूषण नियंत्रणाशी संबंधित नियम आणि कायदे आहेत, परंतु त्यांच्यावर कठोर दक्षता न ठेवली जात नसल्यामुळे ते त्यांना टाळत राहतात. जरी आता बॅटरी आणि नैसर्गिक वायूवर चालणाऱ्या वाहनांना प्रोत्साहन दिले जात असले आणि वाहनांमध्ये धुराचे पाण्यामध्ये रूपांतरित करणारी साधने बसवली जात असले तरी आता हे उपाय देखील प्रभावी सिद्ध होताना दिसत नाहीत. वायू प्रदूषण कमी करण्यासाठी सरकारची दक्षता मुख्यतः फक्त पालापाचोळा जळणाऱ्या शेतकऱ्यांना आणि वाहनांच्या प्रदूषणाची पातळी तपासून त्यावर दंड आकारण्यापुरतीच मर्यादित दिसून येते. त्याची कृपादृष्टी मात्र मोठ्या प्रमाणात धुराची आग ओकणाऱ्या कारखान्यांवर राहत असते.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# भारतीय संस्कृतीला पडलेली दोन मधुर स्वप्ने

# भगवान श्रीकृष्ण आणि संत ज्ञानेश्वर



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

**आज श्रावण वद्य अष्टमी. दोन महापुरुषांचा जन्मदिवस. योगेश्वर श्रीकृष्ण आणि संत ज्ञानेश्वर. दोघेही लोकोत्तर महापुरुष. श्रीकृष्णाने अर्जुनाला निमित्त बनवून गीता सांगितली ती सगळ्या जगासाठी. तीच गीता सर्वसामान्य माणसाला समजावी म्हणून गीतेचा अमृतकलश ज्ञानेश्वर माउलींनी मराठीत आणला. एकाच दिवशी या दोन महात्म्यांची जयंती हा निश्चितच काहीतरी ईश्वरी संकेत असला पाहिजे. 'ज्ञानियांचा राजा' म्हटलं की आमच्या डोळ्यांसमोर ज्ञानेश्वर माउली येतात. पण ज्ञानेश्वर माउली काय किंवा योगेश्वर श्रीकृष्ण काय, दोघेही तसे ज्ञानियांचे राजेच ! सगळ्या राजांचे राजे. तत्वज्ञानांचे तत्वज्ञानी. दोघेही विश्वगुरु ! माउलींनी एवढ्या सुंदर पद्धतीने गीतेचे निरूपण केले की त्यांच्याच शब्दात सांगायचे तर ' माझा मराठीचा बोलू कवतुकें, परी अमृतातेही पैजा जिंके ' असेच ते आहे. केवळ गीता किंवा ज्ञानेश्वरीच नाही तर मराठी भाषेलाही ज्यांनी गौरव प्राप्त करून दिला अशी माझी ज्ञानेश्वर माउली. म्हणून तर एक तरी ओवी अनुभवावी एवढे महत्व माऊलींच्या शब्दांना प्राप्त झाले आहे. युगानुयुगे आणि शतकानुशतके भगवद्गीता आणि ज्ञानेश्वरी या दोन्ही ग्रंथांचे भाविक, कवी, विद्वान आणि सर्वसामान्य जन आकंठ रसपान करीत आले आहेत. अनेकांना ते नित्य नवी प्रेरणा देत आले आहेत. व्यवहार आणि अध्यात्म या दोन्हींमध्ये पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे या ग्रंथातून नक्कीच मिळतात एवढी त्यांची थोरवी आहे.**


ज्ञानेश्वर माउलींनी संत निवृत्तीनाथांच्या आज्ञेवरून ज्ञानेश्वरी सांगितली. निवृत्तीनाथ हे त्यांचे केवळ ज्येष्ठ बंधूच नव्हते तर गुरूदेखील होते. ज्ञानेश्वरी सांगण्याचं कोणतंही श्रेय माउली स्वतःकडे घेत नाहीत. त्याचं कर्तृत्व, मोठेपणा ते आपल्या गुरूंकडे सोपवतात. केवढी ही नम्रता! प्रत्येक लहानसहान गोष्टीचं श्रेय घेण्याची आपली प्रवृत्ती. त्यातून आपला अहंकार नकळत पोसला जातो. माउलींनी गीतेवरील भाष्य म्हणून नऊ हजार ओव्या लिहिल्या. आणि शेवटच्या नऊ ओळीत मागणे मागितले. विश्वात्मक देवाकडे. मी एवढा वाकयज्ञ केला आहे. या यज्ञाने तू संतुष्ट झाला असशील म्हणून प्रसादरूपी मागणे ( पसायदान ) तुझ्याकडे मागतो. जे मागितले ते स्वतःसाठी नाहीच. जगाच्या कल्याणासाठी. म्हणून तर आपण ' जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती, देह कष्टविती परोपकारे ' असे म्हणतो.

ज्ञानेश्वर माउलींनी ' खळांची व्यंकटी सांडो ' असे मागणे मागितले म्हणजे दुष्टांचा दुष्टपणा, दुष्टप्रवृत्ती नष्ट होवो. माउलींच्या शब्दात एवढी ताकद होती की त्यांनी या जगातून दुष्ट लोक नष्ट होवोत असे मागणे मागितले असते तरी त्यांची मागणी पूर्ण झाली असती. पण लोकांच्या चांगुलपणावर माउलींचा विश्वास आहे. खलप्रवृत्ती एकदा नष्ट झाली की लोक चांगलेच वागतील. सज्जनांची मांदियाळी निर्माण होईल. या सृष्टीतील यच्चयावत प्राणी, माणसे एकमेकांचे मित्र होतील. असे झाले की माणसे जी काही मागणी परमेश्वराकडे करतील, ती चांगलीच असेल. तेव्हा अशा माणसांना ' जो जे वांच्छिल तो ते लाहो ' म्हणजे त्यांना हवं असेल ते दे अशी मागणी माउली करतात. हे पसायदान केवळ मराठी माणसांचं नाही, केवळ भारतीयांचं नाही. ते साऱ्या जगासाठी आहे. जातपात, धर्म, भाषा, प्रांत आदी सीमा ओलांडून अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी ते आहे.

देव म्हणजे आकाशातील विस्तीर्ण पटामध्ये आपापल्या तेजानं झळाळणारे तारे असं म्हटलं तर त्या ताऱ्यांमधील सगळ्यात तेजस्वी तारा म्हणजे श्रीकृष्ण आहे असे म्हणता येईल. हाच पट भारतात श्रीराम, श्रीकृष्ण आणि शंकर ( महादेव ) यांच्या उभ्या आडव्या धाग्यांनी आकर्षक आणि मजबूत असा विणला गेला आहे. श्रीकृष्ण, श्रीराम आणि शंकर यांची मंदिरं नाहीत किंवा पूजा होत नाही असा भाग भारतात क्वचितच आढळेल.

त्यातही श्रीकृष्णाच्या जीवनाचा प्रभाव भारतातील कला, काव्य आणि सांस्कृतिक जीवनावर सर्वात जास्त आहे. अनेक कवी, महाकवी, लेखक यांना स्फूर्ती आणि प्रेरणा देणारे हे व्यक्तिमत्व ! लहानांपासून थोरांना आकर्षित करून घेणारे हे व्यक्तिमत्व. भारताच्या विविध भागातील हजारो लोकगीते, लोककथा, प्राचीन चित्रकला, नाट्यकला, नृत्यकला इत्यादींवर आपली अमीट छाप असणारे हे व्यक्तिमत्व ! लावणी, होरी, कजरी, गवळण आदी काव्यप्रकार तसेच अभिजात संगीतातील राग, ख्याल, ठुमरी या सगळ्यांमधील बराच भाग श्रीकृष्ण चरित्राने व त्याच्या कथांनी





व्यापलेला आहे. जसे काव्य,साहित्य प्रकारात नवरस असतात तसा या सगळ्या कला, साहित्यातील ज्याला आपण श्रीकृष्ण रस म्हणूया, तो जर बाजूला काढला तर सगळेच निरस होऊन जाईल. श्रीकृष्ण चरित्राने आम्हाला युगानुयुगे मोहिनी घातली आहे, मार्गदर्शन केले आहे म्हणूनच तो युगपुरुष आहे, युगंधर आहे. काळावर आपली छाप उमटवून काळाचा प्रवाह बदलणारे काही महापुरुष असतात, तसाच हा योगेश्वर कृष्ण. त्याने त्याच्या काळातील कंसासह अनेक असुरांचा विनाश केला. दुष्ट प्रवृत्ती नष्ट केल्या. असे करताना त्याने अनेक राज्ये जिंकली. पण एकाही राज्याचा मोह त्याला पडला नाही. वेगवेगळी राज्ये वेगवेगळ्या सुपात्र अशा व्यक्तींच्या ताब्यात सोपवून तो नामनिराळा झाला हे त्याचे मोठेपण आहे.

श्रीकृष्णाने आपल्या आयुष्यात काही चमत्कार जरूर केले असतील पण त्याचे चरित्र हे महामानवाचे चरित्र आहे. महाभारतातील घटनांचा बारकाईने अभ्यास केला असता श्रीकृष्णाने आपल्या वागणुकीने निरनिराळे आदर्शच प्रस्थापित केले हे आपल्याला दिसून येईल. त्याला त्या काळातील आद्य समाजसुधारकही या दृष्टीने म्हणता येईल. कौरव पांडव युद्धात त्याने पांडवांची बाजू घेतली याचे कारण म्हणजे कौरव त्याचे शत्रू होते म्हणून नव्हे तर कौरव अन्यायाने वागणारे होते म्हणून. पांडवांचा पक्ष घेऊन त्याने सत्य, न्याय, सदाचार यासारख्या नैतिक मूल्यांची प्रतिष्ठापना केली. गाई चारणे, गोपाळांशी मैत्री करणे, त्यांच्यासमवेत राहून सामाजिक समतेचे तत्व त्याने प्रस्थापित केले. ' माखनचोर ' म्हटल्या गेलेल्या कृष्णाने सामान्यांच्या मुखात दही, दूध, लोणी पडावे या उद्देशाने हे घडवून आणले. अन्यथा त्याच्या घरी या सगळ्यांची अजिबात कमतरता नव्हती. गोपाळकाला आज आपण चवीने आणि प्रसाद म्हणून खातो पण त्या वेळी सामान्य गोपाळांनी आणलेले खाद्यपदार्थ एकत्र करून त्याने अनोखी सामाजिक समरसता साधली. सर्वांना समान पातळीवर आणले. इंद्रदेवाची केली जाणारी पूजा बंद करून अनाठायी होणाऱ्या पूजा, कर्मकांड इ. च्या विरोधातच तो उभा ठाकला.

आज स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांची वर्णने आपण आपण पेपरमध्ये, टीव्ही वर पाहतो. श्रीकृष्ण त्याच्या काळात अशाच अत्याचारित स्त्रीवर्गाच्या रक्षणासाठी उभा राहिलेला आपल्याला दिसेल. प्राग्ज्योतिषपूर नावाचे राज्य होते जे बहुधा आजच्या आसाममध्ये असावे. या राज्याचा राजा किंवा प्रमुख नरकासुर होता. अनेक स्त्रियांना पळवून आणून त्याने बंदिवासात ठेवले होते. स्त्रियांचे जिणे खरोखरीच नरक झाले होते. असेही सांगितले जाते या ठिकाणी स्त्रियांचा देहव्यापारासाठी वापर केला जायचा. अशा या स्त्रियांना बंदिवासातून त्याने सोडवले. नरकासुराला संपवले. आता या सोडवलेल्या स्त्रियांच्या पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण झाला.यात त्या स्त्रियांचा काहीही दोष नसताना त्यांना स्वीकारायला समाज तयार नव्हता. आज सुद्धा समाजात ही मानसिकता आपल्याला टिकून असलेली आपल्याला दिसते. इथे श्रीकृष्णाचा दूरदर्शीपणा आपल्याला दिसतो. त्याने प्रसंगी आपले नाव देऊन त्यांचे पुनर्वसन घडवून आणले हा त्याचा केवढा मोठेपणा ! म्हणून श्रीकृष्ण हा आद्य समाजसुधारक होता असेच म्हणावे लागेल.

श्रीकृष्णाचे चरित्र सांगताना काळाच्या ओघात कीर्तनकार, प्रवचनकार,पुराणे, भागवतकार आदींनी दिव्यत्वाचा साज चढवला. त्याचे चरित्र हे त्याच्या नेतृत्वाची, कर्तृत्वाची गाथा सांगण्यापेक्षा चमत्काराच्या कथा असे स्वरूप झाले. या सगळ्यात श्रीकृष्णाने आमच्यासमोर प्रस्थापित केलेले आदर्श, त्याने दिलेली शिकवण याकडे आमचे दुर्लक्ष झाले आणि देव म्हणून आम्ही त्याची पूजा करू लागलो. त्याची पूजा करायची नाही का ? जरूर करायची आहे. त्याची नाही तर कोणाची पूजा करायची ? पण त्याच्या गुणांची पूजा आम्हाला बांधता आली पाहिजे. त्याने सांगितलेल्या मार्गावर चालता आले पाहिजे तरच श्रीकृष्ण चरित्र आम्हाला कळले असे होईल.

या छोट्याशा लेखात श्रीकृष्णाच्या प्रभावी चरित्राला फक्त ओझरता स्पर्श करण्याचा प्रयत्न आहे. एका लेखात सामावणारे हे व्यक्तिमत्व नाही. त्याचं कोणताही नाव घ्या त्यात कमालीचा गोडवा आहे. कान्हा, केशव, माधव, मुरलीधर, मुरारी, देवकीनंदन, मुकुंद सगळीच नावे कमालीची गोड आहेत. तो खरा ' चित्तचोर ' आहे. त्याच्या बालपणीच्या लीलांनी तर सगळ्यांना मोहून टाकले आहे. जसं मी वर म्हटलं की तो आद्य समाजसुधारक मला वाटतो, तसा तो जादूगार संगीतकार आहे. त्याची बासरी सगळ्यांनाच मोहवून टाकते आहे. त्याच्या बासरीचे दिव्य आणि मधुर सूर गोकुळातील गोपी, गोप, आबालवृद्ध एवढेच नव्हे तर गाई, गुरे, रानातील सगळे प्राणी या सगळ्यांना एकत्र आणणारे आहेत. दुष्टांना आपली दुष्ट प्रवृत्ती, हिंस्त्र प्राण्यांना त्यांची हिंस्रता विसरायला लावणारे आहेत. त्याचे संगीत हे असे एक औषध आहे ज्याने सगळे भौतिक ताप हरण केले.

त्याच्या बोलण्यातील गोडवा, हसतमुख आणि प्रसन्न चेहरा, अभ्यासपूर्ण युक्तिवाद करण्याची पद्धत, दुसऱ्याला न दुखावता समजावून सांगण्याची पद्धत, प्रसंगी कमीपणा घेण्याची तयारी, दोन पावले मागे येण्याची तयारी या सगळ्या गोष्टी आमच्यासाठी अनुकरणीय नाहीत का ? त्याने सांगितलेली गीता हा तर वेगळा आणि मोठा विषय आहे. पण त्यातून त्याने दिलेला कर्ममार्गाचा संदेश केवळ अमूल्य असा असून सर्वकालीन मार्गदर्शक असा आहे. श्रीकृष्णाच्या व्यक्तिमत्वाच्या अनेक छटा आहेत. तो कुशल राजकारणी आहे, धुरंधर असा योद्धा आहे, सर्व प्रकारच्या युद्धात प्रवीण आहे, असे असूनही तो अगदीच शेवटचा पर्याय म्हणून शस्त्र हाती धरताना दिसतो. युद्धात कमीत कमी विनाश व्हावा याकडे त्याचे लक्ष असते म्हणूनच जरासंधाशी युद्ध केल्याने प्रजेची हानी होईल या भीतीने तो पळ काढतो. मग त्याला कोणी पळपुटा म्हटले, रणछोडदास म्हटले तरी फरक पडत नाही असा हा लोकोत्तर नेता आहे. समोर आपल्याच प्रियजनांना पाहून कर्तव्यापासून परावृत्त झालेल्या अर्जुनाला युद्धाला परावृत्त करणारा हा योगेश्वर कृष्ण आहे. निमित्त अर्जुन असला तरी अखिल मानवजातीच्या कल्याणासाठीच त्याचा हा उपदेश आहे. भारतीय जनमानसात मान्यता असलेले विविध देव, धर्म, परंपरा, पंथ आदी विविध मार्ग एकट्या त्याच्याकडेच येऊन पोहोचतात.

आकाशात पतितम तोयं यथागच्छति सागरम
सर्वदेव नमस्कारः केशवं प्रतिगच्छति

आज श्रावण वद्य अष्टमी. श्रीकृष्ण आणि ज्ञानेश्वर माऊलींची जयंती आहे. आज फक्त त्यांच्या कार्यकर्तृत्वाचे हे यथाशक्ती केलेले स्मरण.

# आठवणीतील अंबाजोगाई



किर्तनकेसरी स्वर्गीय श्री गणपतराव आबाजी संघई

आधुनिक केसरी

**माणिकचंदजींच्या आवाजातील सुमधुर गीत ऐकताना त्यांचा तो आवाज आजही कानांत घुमतो. प्रापंचिक उदरनिर्वाहाचे कुठलेही निश्चित मिळकतीचे साधन त्यांच्याकडे नव्हते, म्हणून प्रपंचात अर्थिक प्राप्ती हवीच, त्यामुळे ते त्या काळी अर्थार्जनासाठी शासकिय अध्यापक महाविद्यालयात, घरापासून जवळपास अडीच किलोमीटर अंतर स्वत:ची वाजवावयाची पेटी घेऊन ते तेथील विद्यार्थ्यांना गाणी, संगीत शिकवण्याकरिता पायपिटी करीत जात किंवा किर्तनांची साथसंगत करणे यातून त्यांना जी प्राप्ती होत असे, त्यावरच त्यांची दैनंदिन गुजराण ते करीत.**

अंबाजोगाईतील माझा काळ केवळ कल्पनेतील सुखदायक नव्हे तर अगदी प्रत्यक्ष अनुभुतीतील वास्तविकतेत आनंदात गेलेला आहे, मागील एका लेखावर एक प्रतिक्रीयाही वाचण्यांत आली होती ( श्री. गिरीश कुलकर्णी ) की या देशपांडे गल्ली ते गणेशपार या दरम्यानचा परिसर, नाटक, साहित्य किंवा संगीत, एकेक किस्से अफलातुनच, अशी ती प्रतिक्रीया होय! जे महान संत, मोठी माणसे, समाजाचे, राष्ट्राचे, प्रत्येक व्यक्तींचे कल्याण नेमके कशात आहे असे सांगणाऱ्या, समाजात प्रबोधन करणाऱ्या व्यक्ती किंवा जे अगदी हाडांचे कलाकार असतात, त्यांची समाजात हेळसांड होते, विविध क्लेश त्यांना अख्खे जीवनभर सहन करीतच आयुष्य कंठल्याचे ऐकण्यांत, पाहण्यांत येते, हे निर्विवाद सत्त्य होय.

संत गोरा कुंभाराची कथा प्रत्येकानेच ऐकलेली आहे, की श्री पांडुरंगाच्या नामात आनंद घेत असतांना पूर्ण देहभान विसरुन ते नामसंकिर्तनांत मन रंगून गेलेले असताना, त्यांचे मूल चिखल तुडवत असताना त्यांच्या पायाखाली चिखलात तुडवले गेले तरी त्यांना त्या गोष्टीची यत्किंचितही जाणीव झाली नव्हती व त्यांच्या कुटुंबावर झालेला आघात त्यांनी सहन केला व भगवंताला कोणताही दोष त्यांनी लावला असे कुणीही, कुठेही लिहिले नाही.

एका अभंगात ते म्हणताताही की,

**तुझे रुप चित्ती राहो, मुखी तुझे नाम |**
**देह प्रपंचाचा दास, सुखे करो काम ||**

याच अभंगातील भक्तीतील फार मोठे सिद्धांत पहावयास मिळतात,

**देहधारी जो जो त्याचे विहित नित्य कर्म,**
**सदाचार, सन्नितीहून आगळा न धर्म,**
**तुला आठवावे, गांवे, हाच एक नेम ||**
**तुझ्या पदी वाहिला मी देहभाव सारा,**
**उरे अंतराळी आत्मा, सोडुनि पसारा,**
**नाम तुझे घेतो गोरा, म्हणून आठवावे ||**
**तुझे नाम पांडुरंगा, सर्व ताप नाशी,**
**वाट प्रवासाशी देती स्वये पापराशी,**
**दिसो लागलीसे डोळा, अरुपि अनाम ||**

वरील कथा व अभंग सांगण्याचा उद्देश, अंबाजोगाईतील जुने, फारच ज्यांच्या नांवाचा गवगवा जगात ईतरत्र फार पसरला नाही, असे जुने गायक, अंबाजोगाईचे माझ्या माहितीनुसार पहिलेच आकाशवाणीचे मान्यताप्राप्त गायक, श्री माणिकचंद संघई हे एक गीत प्रत्येक ठिकाणी, प्रत्येक कार्यक्रमात गात असत, ते गीत श्री गोरा कुंभार या संतावर लिहीलेले होते,

**नवलाची गोष्ट ऐक गडे बाई, कुंभाराने बाळ तुडविले पायी**

बारीक, पातळ, आवाज हे त्यांचे वैशिष्ठ्य श्री. माणिकचंदजींच्या आवाजातील सुमधुर गीत ऐकताना त्यांचा तो आवाज आजही कानांत घुमतो.

प्रापंचिक उदरनिर्वाहाचे कुठलेही निश्चित मिळकतीचे साधन त्यांच्याकडे नव्हते, म्हणून प्रपंचात अर्थिक प्राप्ती हवीच, त्यामुळे ते त्या काळी अर्थार्जनासाठी शासकिय अध्यापक महाविद्यालयात, घरापासून जवळपास अडीच किलोमीटर अंतर स्वतःची वाजवावयाची पेटी घेऊन ते तेथील विद्यार्थ्यांना गाणी, संगीत शिकवण्याकरिता पायपिटी करीत जात किंवा किर्तनांची साथसंगत करणे यातून त्यांना जी प्राप्ती होत असे, त्यावरच त्यांची दैनंदिन गुजराण ते करीत. आकाशवाणी औरंगाबाद-परभणी केंद्राचे ते मान्यताप्राप्त कलाकार होते. वर लिहील्याप्रमाणे त्या काळी कलाकारांना स्थानिक पातळीवर मानमान्यता मिळावयाची नाही, प्रतिष्ठा हा त्या काळात प्रचलीत झालेला शब्दप्रयोग नव्हता.

सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक, नाट्यसंगीत, ठुमरी, टप्पा गाणारे गायक डॉ. वसंतराव देशपांडे यांच्याबद्दल प्रसिद्ध साहित्यिक म्हणतात की, डॉ. वसंतरावांचे गाणे

भास्कर सोनोपंत देशपांडे

न आवडणारे आकाशवाणी केंद्रावर कितीतरी गायक गायिका रागरागिण्या नासत बसलेल्या असत, मात्र डॉ. वसंतरावांचे आकाशवाणीला का वावडे असावे.

वरील प्रसंगावरुन गुणवंतांची ओळख न करुन घेणाऱ्या समाजातील आजची अवस्था,
लबाड जोडीती इमलेमाड्या,
गुणवंतांना मात्र झोपड्या,
पतिव्रतेच्या गळ्यात धोंडा, वेश्येला मणीहार या श्री गदिमांच्या गाण्यातील वास्तविकता हीच खरी कलियुगातील शोकांतिका होय.

श्री माणिकचंद संघई यांच्या जिवनांत ते उत्कृष्ट गायक, पेटीवादक असूनही होरपळ होत असे. मात्र ते याबद्दल कुठेही वाच्यता न करणारे व प्रारब्धावर सोडुन देत. देशपांडे गल्लीतील थोरले देवघर येथे प्रतिवर्षी होणाऱ्या श्री दत्तजयंती उत्सवात, मार्गशिर्ष शुद्ध सप्तमी ते मार्गशिर्ष पौर्णिमा, वद्य प्रतिपदा या काळात जी किर्तने आजही होतात, श्री माणिकचंद संघई ह किर्तनकारांच्या पेटीच्या साथीला असत व एक गाणे गात व सर्व भक्तांना त्या गाण्यातुन बोध करीत असत, तो आजही फक्त स्मरणांत आहे, माझ्या बुद्धिने तो अजुन स्विकारलेला नाही,

**निशिदिनी भजनी मन रंगावे,**
**दत्तप्रभुंचे स्मरण करावे, भजन करावे |**

अशा अंबाजोगाईतील त्या काळातील सुखद आठवणींचा ठेवा आजही माझ्या हृदयांत मी जपुन ठेवलेला आहे.

# कृष्ण

आधुनिक केसरी

**कृष्ण म्हणजे श्रीमदभगवद्गीता, जीवनाचं सार. प्रभू रामाने जसा भर दुपारी मध्यानी अवतार घेतला तसा कृष्णाने पार मध्यरात्री अवतार घेतला. जन्म झाल्याबरोबर त्याला ते ठिकाण सोडून गोकुळात जावं लागलं. गोकुळात कृष्ण फक्त वयाच्या आठव्या वर्षापर्यंत राहिला. म्हणजे राधा राणी फक्त तोवर कृष्णासोबत होती, कृष्ण 8 वर्षाचा होऊ पर्यंत. जे राधा आणि कृष्णविषयी चुकीची चर्चा करतात त्यांनी या गोष्टीचा जरूर विचार करावा. 8 वर्षाच्या बालकाचे कसल्या पद्धतीचे प्रेमसंबंध असतील राधिकेशी, ईतका कमी सहवास लाभून सुद्धा राधेचं नांव कृष्णाशी कायमचं जोडलं गेलं. किंबहुना तीचं प्रेम इतकं नितळ, निस्सीम, निर्मळ होतं की तिचं नांव कायमचं कृष्णाच्या आधी लागलं.**

नावातील एकही अक्षर सरळ नसणारा हा देव. प्रत्येक शब्द हा जोडाक्षर. जितकं नांव कठीण तितका समजायला कठीण. पण एकदा समजला की जीवनाचा अर्थ समजलाच म्हणून समजा. जीवन म्हणजे काय हे समजून घ्यायचं असेल तर कृष्ण समजून घ्यावा. दशावतारी भगवंताचा आठवा अवतार म्हणजे कृष्ण. सातवा अवतार प्रभू राम. राम ही अक्षरे सुद्धा सरळ अन त्याचं वागणं ही सरळ, मर्यादेत, म्हणून मर्यादा पुरुषोत्तम. रामाने आपल्या जीवनात कधीच कोणतीच मर्यादा ओलांडली नाही, तरीही काही जणांनी त्याच्यात दोष शोधले, त्याच्यावर टीका केली. मग पुढच्या अवतारात प्रभूने सर्व मर्यादा ओलांडल्या. करा काय करायचं ते. जीवनात आचरण रामसारखं असावं अन् समजून कृष्ण घ्यावा. कृष्ण आचरणात आणायच्या भानगडीत पडू नये. कृष्ण म्हणजे श्रीमदभगवद्गीता, जीवनाचं सार. प्रभू रामाने जसा भर दुपारी मध्यानी अवतार घेतला तसा कृष्णाने पार मध्यरात्री अवतार घेतला. जन्म झाल्याबरोबर त्याला ते ठिकाण सोडून गोकुळात जावं लागलं. गोकुळात कृष्ण फक्त वयाच्या आठव्या वर्षापर्यंत राहिला. म्हणजे राधा राणी फक्त तोवर कृष्णासोबत होती, कृष्ण 8 वर्षाचा होऊ पर्यंत. जे राधा आणि कृष्णविषयी चुकीची चर्चा करतात त्यांनी या गोष्टीचा जरूर विचार करावा. 8 वर्षाच्या बालकाचे कसल्या पद्धतीचे प्रेमसंबंध असतील राधिकेशी, ईतका कमी सहवास लाभून सुद्धा राधेचं नांव कृष्णाशी कायमचं जोडलं गेलं. किंबहुना तीचं प्रेम इतकं नितळ, निस्सीम, निर्मळ होतं की तिचं नांव कायमचं कृष्णाच्या आधी लागलं.

**कृष्ण-राधे कोई ना केहता, केहते राधे-शाम,**
**जनम जनम के फेर मिटाता एक राधा का नाम,**

असं हे राधा आणि कृष्णाचं प्रेम. किंबहुना प्रेमाचं दुसरं नांव म्हणजेच राधा व कृष्ण. कृष्णाला 16 हजार 108 बायका. त्याचाही इतिहास. ज्यांना त्याने मुक्त केलं त्या म्हणू लागल्या आता आम्ही आमच्या घरी जाऊ शकणार नाही तेव्हा त्याचा स्वीकार केला. अन् नुसता स्वीकारच नाही केला त्या प्रत्येकीसोबत त्यांच्या सुख दुःखात सहभागी होता. आज काही महाभाग म्हणतात कृष्णाने इतक्या बायका केल्या तर आम्हाला काय हरकत आहे. अरे त्याने आग लागलेली 50 गावे गिळून टाकली होती, तू जळता एखादा कोळसा गिळून दाखव की आधी मग कृष्णाची बरोबरी कर, मी आधीच म्हटल्याप्रमाणे कृष्ण आचरणात नाही समजण्यात खरी मजा, त्यासाठी गीता समजून घेणं महत्वाचं.



गीतेमध्ये काय नाही? तर गीतेत सर्व आहे. जीवनातील कोणत्याही प्रश्नाचं उत्तर यात मिळेल. आणि सर्वात महत्वाचं म्हणजे हे जीवन शास्त्र कृष्णाने अर्जुनाला युद्धभूमीवर सांगितलं. यावरून अर्जुनाचीसुद्धा योग्यता किती मोठी आहे हे समजतं.

अर्जुन या भूतलावर असा एकमेव मानव झाला जो या नाशवंत देहासह स्वर्गात 5 वर्षे राहिला व शस्त्र चालवण्याचं शिक्षण घेतलं. या देहांसह स्वर्गात जाता येत नाही पण अर्जुन एकमेव जो 5 वर्षे तिथे राहिला. म्हणजे अर्जुनाची योग्यता काय आहे ते समजतं. त्या अर्जुनाच्या डोळ्यांवर आलेलं मोह, माया याचं पटल दूर करण्यासाठी कृष्णाने गीता सांगितली. गीता समजण्यासाठी अर्जुन किती तयार आहे हे आधी कृष्णाने आधीचे 9 अध्याय पाहिलं. त्याची तयारी करून घेतली. मग पुढे खरा गूढार्थ सांगितला. विश्वरूप दाखवतांना सुद्धा त्याला आधी दिव्य दृष्टी दिली, त्याची तयारी करून घेतली,

मग त्याला दाखवलं की सर्व काही करणारा मीच आहे. तू फक्त निमित्तमात्र आहेस, असा हा कृष्ण.

त्याच्याविषयी किती सांगावं अन किती नको, तो जितका अनुभवू तितका तो जास्त भावतो, जास्त आवडतो, त्याला जितकं समजून घेऊ तितकं कमीच. त्याच तत्वज्ञान म्हणजे संपूर्ण जीवनाचं सार, ते समजून घेतलं की जीवन समजलं, जीवन सफल झालं. मनुष्य जीवनमुक्त झाला, अशा या कृष्णाला वंदन.

**श्री कृष्ण गोविंद हरे मुरारी,**
**हे नाथ नारायण वासुदेव,**
**प्रद्युम्न दामोदर विश्वनाथ,**
**मुकुंद विष्णू भगवन नमस्ते!!!**

श्री कृष्णाला समजून घेण्यासाठी आपणाला श्री कृष्ण परमात्मा बुद्धी प्रदान करो हीच प्रार्थना.

कुरुक्षेत्रात युध्दभूमीवर जेव्हा कर्ण व अर्जुन समोरा-समोर आले तेव्हा, कर्णाने वासुकी नामक अस्त्र धनुष्याला लावून अर्जुनाच्या! दिशेने सोडले. प्रत्येकाला वाटले आता हे अस्त्र अर्जुनाचा शेवट करणार... तितक्यात, श्रीकृष्णाने आपल्या पायाचा भार रथावर दिला. रथ थोडा खाली खचला.

व ते अस्त्र अर्जुनाच्या गळ्याचा वेध न घेता मुकुट उडवून गेले. नंतर, सूर्य अस्ताला गेल्यानंतर जेव्हा, युध्द विराम होत असे. तेव्हा, पहिल्यांदा श्रीकृष्ण रथाच्या खाली उतरत असे व नंतर अर्जुनाला खाली उतरण्यास हात देत असे. जेव्हा, पूर्ण युध्द संपले व पांडवांचा विजय झाला. तेव्हा, श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणाला, "आधी तू रथाच्या खाली उतर." त्यानुसार अर्जुन रथाच्या खाली उतरला. त्यानंतर श्रीकृष्णाने घोड्यांचे लगाम घोड्यांच्या अंगावर टाकले घोडे बाजूला काढले व नंतर च स्वतः रथाच्या खाली उतरला. दोघेही थोडे पावले चालून गेली तोच, रथाने धड धड करत प्रचंड पेट घेतला. जमलेले सर्व जण आश्चर्या ने ते दृश्य पाहत होते. तेव्हा अर्जुन म्हणाला, आपण रथातून उतरल्या उतल्या रथ आपोआप कसा काय पेटला "अरे श्रीकृष्णा हा काय प्रकार आहे? "तेव्हा भगवान श्रीकृष्ण म्हणाले की, "युध्दात जितके शस्त्र-अस्त्र तुझ्या दिशेने सोडण्यात आले होते, ते माझ्यामुळे तुला स्पर्श ही करू शकले नाहीत. ते सर्व अस्त्र अदृश्य रूपाने रथाच्या भवती फिरत राहिले व आता जेव्हा मी तुझ्या रथाची धुरा सोडून दिली.. तेव्हा, ह्या अस्त्रांचा परिणाम आता तु पाहत आहेस." त्याच प्रमाणे मानवी देह आहे. जोपर्यन्त परमेश्वरानेआपले जीवनरुपी लगाम पकडले आहेत तो पर्यंत आपल्या देहात प्राण ,आनंद ,सुख ,ऐश्वर्य नांदत आहे. पण जेव्हा तो आपणास सोडतो.. तेव्हा आपलीही अवस्था त्या रथासारखीच होते .

# विमी : एक शापित सौंदर्य



सुरेश सिरसीकर
संपर्क क्र. 9146040000

आधुनिक केसरी

**मागच्या वेळी आपण मीनाकुमारीबद्दल आजवर प्रकाशात न आलेल्या गोष्टी जाणून घेतल्या. आज आपण जाणून घेऊयात ६० च्या दशकातील सुंदर आणि गोड दिसणाऱ्या अभिनेत्री विमी बद्दल. २२ ऑगस्ट तिच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने. विमीचं नाव घेतलं की आठवतो 'हमराज' (१९६७) मधला गोड, निरागस व सुंदर चेहरा. मीनाकुमारीने रील लाईफमध्ये 'ट्रजेडी क्वीन' च्या भूमिका साकारल्या आणि रिअल लाईफ मध्ये ही ती 'ट्रजेडी क्वीन' च बनून राहिली. पण विमीचं असं नव्हतं.**

विमीचा जन्म १९४३ ला एका मध्यमवर्गीय कुटुंबात पंजाबच्या जालंधर येथे झाला. विमी दिसायला खूपच आकर्षक, सुंदर आणि गोड होती. तिची विचारसरणी ही आधुनिक होती त्यामुळे तिने घरच्यांच्या विरोधात जाऊन कोलकात्याच्या श्रीमंत मारवाडी व्यापारी शिव अग्रवालशी प्रेम विवाह केला. शिव अग्रवाल लखपती असल्याने घरात पैशाची कसलीच कमी नव्हती. घर - गाडी, नोकर - चाकर. एकदा कोलकात्यात (त्यावेळेचा कलकत्ता) एका पार्टीत संगीतकार रवीची नजर 'विमी' वर पडली. त्यावेळेस बी. आर. चोप्रा आपली आगामी फिल्म 'हमराज' साठी नवीन चेहऱ्याच्या शोधात होते आणि संगीतकार रवी हे 'हमराज' चित्रपटाचे संगीतकार होते. संगीतकार रवीने दोघांना मुंबईला बोलावलं. विमीची ही लहानपणापासूनच सिनेमात काम करण्याची आवड होती. बी. आर. चोप्राने 'हमराज' (१९६७) साठी तिची निवड केली. सुनील दत्त आणि राजकुमार हे तिचे नायक होते, त्यामुळे तीचा आनंद गगनात मावत नव्हता. 'हमराज' (१९६७) सुपर - डुपर हिट झाला आणि विमी रातोरात पहिल्या क्रमांकाच्या तारकामध्ये जाऊन बसली. वर्तमानपत्रात तिच्याबद्दल बातम्या येऊ लागल्या.



चाहते तिच्या सौदर्याचे दिवाने झाले. सर्वत्र तिच्या सौन्दर्याची चर्चा होत होती, हे पाहून विमीचा आनंद गगनात मावत नव्हता. ती या यशात हरवून गेली. तिनं आपल्या पतीसह कोलकाता सोडून कायमस्वरूपी जुहूला बंगला घेऊन आपल्या पतीसह राहायला लागली. निर्मात्याच्या तिच्या घरासमोर रांगा लागल्या. ती एका सिनेमासाठी तीन लाख रुपये घेऊ लागली. सौन्दर्य आणि यशाने तिला अहंकारी बनविलं. तिने काही व्यवसायात ही पैसे गुंतविले. 'हमराज' नंतर तिचा 'आबरु' (१९६८) सिनेमा आला, यात तिच्या सोबत अशोक कुमार आणि निरूपा रॉय होती. हा सिनेमा 'अवरेज' चालला. पण त्यापुढील तिचे चित्रपट चालनासे गेले. कामाच्या महत्वकांक्षा पोटी तीने एका मॅगझीनला बोल्ड फोटो दिले. त्यामुळे तिच्यात आणि तिचे पती शिव अग्रवाल यांच्यात दुरावा आला. परिणामी विमीला घटस्फोट देऊन शिव अग्रवाल आपल्या मुलांसहित कोलकात्याला निघून गेले. पती सोडून गेल्यामुळे ती डिप्रेशन मध्ये आली, सिनेमेही चालत नव्हते त्यामुळे ती दारू प्यायला लागली. तिने ज्या व्यवसायात पैसे गुंतविले होते तो व्यवसायही डबघाईस आला. खर्चिक स्वभावामुळे ती गरीब होत चालली. त्यामुळे तिची दारूची सवय वाढतच गेली. आर्थिक टंचाईमुळे शेवटी तिला जुहूचा बंगला विकावा लागला. निर्माता 'जॉली' सोबत तिने घरोबा केला पण तिच्या खर्चिक स्वभावामुळे व दारूच्या अति व्यसनामुळे 'जॉली' तिला सोडून गेला. तिला झोपडपट्टीत आश्रय घ्यावा लागला. विमी दारूची एवढी ॲडिक्ट झाली होती की दारूसाठी तिला 'वेश्या व्यवसाय' सुद्धा करावा लागला. इकडे इंडस्ट्री तिला विसरून ही गेली. महागड्या दारू पासून ती देशी दारूवर ती कधी आली तिला कळलं सुध्दा नाही. परिणामी तिची किडनी फेल झाली. नानावटी हॉस्पिटलमध्ये जनरल वॉर्ड मध्ये तिला भरती करण्यात आलं, तिला भरती करण्यात आलं तेंव्हा तिच्यासोबत कुणीच नव्हतं आणि तिथेच ती अवघ्या वयाच्या ३३ व्या वर्षी म्हणजेच २२ ऑगस्ट १९७४ ला ती जगाचा निरोप घेतली. तिच्या अंत्ययात्रा व अंत्यविधीला पैसा ही नव्हता, कुटुंब, नातेवाईक आणि माणसं ही नव्हती. तिच्या एका हातगाडीवाला चाहत्यांने (फॅनने) तिला ओळखलं आणि तिचे शव हातगाडीवर टाकून शमशानाकडे नेले आणि अंत्यविधी केले, तिच्या अंतविधीला मोजून चार माणसे होती. हा करून अंत पाहून मन हेलावून टाकतं. यश, सौंदर्य, अहंकार माणसाला किती आंधळा बनवितो की यात आपलं कोण, परकं कोण यातला फरक कळत नाही, एवढेच काय आपण काय करतोय, चांगलं करतोय की वाईट करतोय, हे सुध्दा कळत नाही. पण एका सुखी कुटुंबातील सौदर्यवतीचा असा करून अंत बघून मन हेलावतं आणि सुन्न होतं. तिची चित्रपट कारकीर्द फक्त ७ वर्षाचीच राहिली. या ७ वर्षाच्या कारकिर्दीत ९ चित्रपट दिले. त्यात 'आब्रु' व शशी कपूर सोबतचा 'पतंगा' '(१९७१) 'अवरेज' सिनेमे होते. बाकी सगळे फ्लॉप. 'हमराज' हा पहिलाच चित्रपट विमीचा सुपर - डुपर हिट होता, यातील गाणी आजही श्रवणीय आहेत.

# भारतीय फुटबॉल महासंघाची नामुष्की

आधुनिक केसरी

श्याम ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
संपर्क : ९९२२५४६२९५

फुटबॉल हा खेळ भारतात आता चांगलाच लोकप्रिय होऊ लागला आहे. गल्लीबोळात मुले फुटबॉल खेळताना दिसत आहे. क्रिकेटच्या लोकप्रियतेच्या मानाने फुटबॉल अजूनही खूप मागे असले तरी फुटबॉलचे चाहते वाढत चालले आहेत. आपल्या महिला आणि पुरुष फुटबॉल संघाचीही कामगिरी चांगली होत आहे. अलीकडे आपल्या देशात आंतरराष्ट्रीय फुटबॉल सामनेही होऊ लागले आहेत त्यामुळे देशात फुटबॉलला अच्छे दिन आले आहेत असे वाटू लागले असतानाच आंतरराष्ट्रीय फुटबॉल महासंघाने ( फिफा ) ने भारतीय फुटबॉल महासंघावर (एआयएफएफ ) वर निलंबनाची कारवाई केली. हे निलंबन काही गोष्टींची पूर्तता केल्यावर मागे घेतले जाईल मात्र त्यामुळे भारतीय फुटबॉल महासंघाची नामुष्की झाली असून भारतीय फुटबॉलसाठी हे शुभचिन्ह नाही हे मात्र नक्की. फिफाने भारतीय फुटबॉल महासंघाच्या केलेल्या निलंबनामुळे देशाची फुटबॉल जगतात पत कमी झाली आहे. देशातील फुटबॉल चाहत्यांसाठी आणि खेळाडूंसाठी हा मोठा धक्का आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या देशात क्रीडा क्षेत्रात राजकारण होत नसून क्रीडा क्षेत्रात पारदर्शकता आली आहे असे म्हटले असताना ही कारवाई झाली आहे. भारतीय फुटबॉल महासंघात ( एआयएफएफ ) तिसऱ्या पक्षाचा हस्तक्षेप वाढल्याने ही कारवाई केल्याचे फिफाच्या वतीने सांगण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाने मे महिन्यात भारतीय फुटबॉल महासंघाची कार्यकारणी बरखास्त केली होती. तसेच खेळाचे नियोजन करण्यासाठी महासंघाच्या घटनेत दुरुस्ती आणि गेल्या १८ महिन्यापासून प्रलंबित असलेल्या निवडणुका घेण्यासाठी तीन सदस्यीय समिती निवडली होती. प्रतिउत्तरा दाखल फिफा आणि आशिआई फुटबॉल महासंघाने एएफसीचे सरचिटणीस विंडसर जॉन यांच्या नेतृत्वाखालील एक पथक भारतीय फुटबॉल भागधारकांना भेटण्यासाठी पाठवले होते. एआयएफएफ ने ऑगस्टच्या अखेर पर्यंत आपल्या कायद्यात सुधारणा करावी आणि १५ सप्टेंबर पर्यंत निवडणुका घेण्यासाठी धोरण आखावे अशी सूचना या पथकाने केली आहे. एआयएफएफ कार्यकारी समितीचे अधिकार ग्रहण करण्यासाठी प्रशासकांची समिती स्थापन करण्याचा आदेश रद्द करण्यात आल्यानंतर आणि एआयएफएफ प्रशासनाला दैनंदिन कामकाजाचे नियंत्रण मिळाल्यानंतर निलंबन मागे घेण्यात येईल असे फिफाने म्हटले आहे. मात्र हे प्रकरण न्यायालयात असल्याने फिफाच्या म्हणण्यानुसार लवकरच यावर तोडगा निघेल असे वाटत नाही त्यामुळे भारतीय फुटबॉलला बराच काळ निलंबित राहावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. भारतीय फुटबॉल महासंघावरील निलंबनाचा भारतीय फुटबॉलवर मोठा परिणाम होणार आहे. या निलंबनामुळे भारतात होणारा १७ वर्षाखालील महिला विश्वचषक हिरावून घेतला जाऊ शकतो. या विश्वचषकाच्या आयोजनासाठी संयोजन समितीने खूप मेहनत घेतली आहे. खेळाडूंनीही खुप मेहनत घेतली आहे. आपला संघ अव्वल नसला तरी देशासाठी या स्पर्धेत विजय मिळवायचा असे स्वप्न खेळाडूंनी पाहिले आहे. खेळाडूच नाही तर संपूर्ण देशाचे या स्पर्धेकडे लक्ष लागले होते. मैदानावरील तयारी त्याची तपासणी सर्व काही पूर्ण झाले होते आता निलंबित झाल्याने या सर्व मेहनतीवर पाणी पडले आहे. एएफसी आशिया करंडकासाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे पण निलंबनामुळे भारताला या स्पर्धेत सहभागी होता येणार नाही त्याचा परिणाम संघाच्या प्रगतीवर होणार आहे. या निलंबनाचा एकूणच भारतीय फुटबॉलला मोठा फटका बसणार आहे म्हणूनच हा विषय शक्य तेवढ्या लवकर निकाली काढणे गरजेचे आहे.

# ज्योतिर्लिंग- त्र्यंबकेश्वर



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**आपल्या देशात एकूण बारा ज्योतिर्लिंग आहेत. सोमनाथ, मल्लिकार्जुन, महाकालेश्वर, ओंकारेश्वर, वैद्यनाथ, भीमाशंकर, त्र्यंबकेश्वर, केदारनाथ, श्री रामेश्वर, श्री नागेश्वर, काशी विश्वनाथ, आणि घृष्णेश्वर. यातील घृष्णेश्वर, त्रंबकेश्वर, भीमाशंकर, औंढा नागनाथ आणि परळी वैजनाथ, ही पाच ज्योतिर्लिंग हे महाराष्ट्रात आहेत. देवांचा देव म्हणजे महादेव असे आपण म्हणत असतो. आणि मनःपूर्वक भक्ती केल्यास सर्वात लवकर प्रसन्न होणारा देव म्हणजे शिवशंकर आणि म्हणूनच त्याला भोळा शंकर असे आपण म्हणतो.**





आपल्या पुराणा नुसार ज्या ज्या ठिकाणी भगवान शिव प्रकट झाले आहे. त्याच्या त्या त्या ठिकाणी ही ज्योतिर्लिंग स्थापना झालेली आहेत. आपल्या संस्कृतीत या बारा ज्योतिर्लिंगाला खूपच महत्त्व आहे. जो जो त्याच्या नावाचा जप करतो त्याचे पाप नाहीसे होते. त्र्यंबकेश्वर हे ज्योतिर्लिंग नाशिक जिल्ह्यात असून नाशिक पासून 28 ते 30 किलोमीटर अंतरावर आहे. गोदावरीचे उगमस्थान आहे।. ब्रह्मगिरी पर्वता च्या पायथ्याशी त्र्यंबकेश्वर वसलेले आहे. समुद्र सपाटीपासून 3000 फूट उंचीवर हे ठिकाण आहे.

पुरातन काळात हे मंदिर बांधण्यात आलेले आहे. तिथे बाळाजी बाजीराव पेशवे यांनी जुन्या मंदिराच्या जागेवर हे बांधलेले आहे. मंदिराच्या चारी बाजूला चार दरवाजे आहेत पश्चिमेला असलेला दरवाजा हा काही विशेष कार्य असेल त्याच वेळी उघडला जातो बाकी दिवस तीन दरवाजे उघडे असतात. हे मंदिर काळ्या पाषाणापासून बनलेले आहे. मंदिराची रचना आकर्षक आहे. मंदिराचे कळसावर पाच सुवर्णकलश असून ध्वजा पंचधातूची आहे.

हे शिवलिंग आपल्याला डोळ्याच्या आकाराचे दिसते. त्यामध्ये पाणी भरलेले असते परंतु आपण जर नीट बघितले तर त्यात ब्रह्मा विष्णू आणि महेश असे तीन छोटे लिंग दिसतात हे मंदिर कालसर्पपूजेसाठी प्रसिद्ध आहे. तसेच या ठिकाणी नारायण नागबळी, त्रिपिंडी श्राद्ध, रुद्राभिषेक, लघुरुद्र, आदी धार्मिक विधी केले जातात अनेक ठिकाणाहून कालसर्प शांती व नारायण नागबळी, करण्यासाठी लोक या ठिकाणी येत असतात. ठराविक ठिकाणी हे विधी होत असतात.

त्रंबकेश्वर ही त्रंबक ऋषींची तपोभूमी होती व गोहत्या पापातून आपल्याला मुक्ती मिळावी म्हणून गौतम ऋषींनी येथे कठोर तपस्या केली होती आणि शिवाकडून गंगा नाशिकला अवतरावी असा वर मागितला होता या वरामुळे गोदावरी येथे उगम पावली असे सांगण्यात येते. त्र्यंबक ऋषीच्या तपश्चर्येमुळेच या मंदिराला त्र्यंबकेश्वर असे नाव पडले.

गंगा द्वार व ब्रह्मगिरीचा निसर्ग परिसर आणि त्र्यंबकेश्वर हे तीर्थक्षेत्र असल्याने वर्षभर येथे भाविकांची खूप गर्दी असते. त्यातही श्रावणी सोमवार. श्रावण महिन्यात आणि शिवरात्रीला येथे भाविकांचा फार मोठ्या प्रमाणात दर्शनासाठी ओघ असतो तसेच कुशावर्त तीर्थ हे कुंड आहे त्यातील पाणी पवित्र असल्याकारणाने येथेही स्नान करण्यासाठी खूप गर्दी असते. येथेच निवृत्तीनाथांची समाधी असून तेथेही दरवर्षी मोठी यात्रा भरते.

बारा ज्योतिर्लिंगाचे एक स्तोत्र आहे. या स्तोत्रामध्ये बारा ज्योतिर्लिंगांची नावे, त्यांची स्थाने, आणि स्तोत्र पठण करण्याचे फळ सांगितले आहे. बारा ज्योतिर्लिंग स्तोत्र हे पुढील प्रमाणे आहे-

**सौराष्ट्रे सोमनाथंच श्रीशैले मल्लिकार्जुनम्। उज्जयिन्यां महाकालमोङ्कारममलेश्वरम् ॥१॥**
**परल्यां वैद्यनाथंच डाकिन्यां भीमशंकरम्। सेतुबन्धे तु रामेशं नागेशं दारुकावने ॥२॥**
**वाराणस्यां तु विश्वेशं त्र्यम्बकं गौतमीतटे। हिमालये तु केदारं घृष्णेशंच शिवालये ॥३॥**
**एतानि ज्योतिर्लिङ्गानि सायं प्रातः पठेन्नरः। सप्तजन्मकृतं पापं स्मरणेन विनश्यति ॥४॥**

हे स्तोत्र सायंकाळी व प्रातःकाळी पठण केल्यास सर्व पापांचा विनाश होतो, असे सांगितले आहे.



# "आरोग्यम धनसंपदा" शरीर हीच माणसाची खरी संपत्ती : शिवाजी तावरे

आधुनिक केसरी न्यूज

**दौलताबाद :** देवगिरी दौलताबाद येथील पत्रकार संघ व फिट ऍंड फाईन वेलनेस गृप च्या वतिने आजादी का अमृत महोत्सवा निमित्ता आरोग्य तपासणी, सकस आहार व बॉडी फॅट चेकअप शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबीराचे उद्घाटन दौलताबाद पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक शिवाजी तावरे, फिट ॲड फाईन गृप चे शैलेश आहेरकर, डॉ. दिपक आहेर, पत्रकार संघाचे आमेर शेख, दौलताबाद गांवच्या, दिपक घुसळे, कडु किर्तीकर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी पोलीस निरीक्षक शिवाजी तावरे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, माणूस आयुष्यभर पैसे कमावण्याच्या मागे धावतो. या नादात तो आपल्या शरीराकडे दुर्लक्ष करतो. मात्र, आरोग्यम धनसंपदा शरीर हीच माणसाची खरी संपत्ती आहे. ती संपत्ती टिकविण्यासाठी प्रत्येकाने नियमित व्यायाम करत सकस संतुलित आहार घेत आपल्या शरीराची काळजी घ्यावी. आजच्या या धकाधकीच्या युगामध्ये प्रत्येकजण हा व्याधीने त्रस्त आहे. शरीराची खरी किंमत कळली ती करोनाच्या काळात ज्याची शारिरीक व मानसिक दुष्ट्या स्थिती चागली होते ते या काळात तग धरून होते. त्यामुळे शरिर संपत्ती ही खरी संपती आहे.

या शिबीरात दौलताबाद पोलीस स्टेशन सर्व पोलीस कर्मचारी सहभागी झाले होते. याप्रसंगी पत्रकार संघाचे जावेद शेख, अभय विखणकर, शिवाजी गायकवाड, शिवाजी आस्वार, बी.के. पठाण, सय्यद लाईकोदीन, किशोर पाटील, जगन्नाथ भंगत, प्रकाश लकडे, सय्यद मोसीन, गणेश कोठुळे, कडु किर्तीकर, शेख लाला, शेख बाबा, उदय देशपांडे आदीची उपस्थिती होती. यावेळी सुत्रसंचलन शिवाजी गायकवाड यांनी केले तर आभार अभय विखणकर यांनी मानले.

# मनपाच्या पठाणी करवसुली विरोधात किरण जोंधळे यांच्या नेतृत्वाने जोरदार जनआंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महानगर पालिका प्रशासनाकडून वलवाडी, वाडीभोकरसह नविन समाविष्ट 11 गावे व धुळे शहरातील नागरिकांना अव्वाच्या सव्वा घरपट्टी आकारण्यात आली आहे. या सर्दभात मनपा प्रशासनाने नागरिकांना नोटीस देण्यात आल्या असून त्या त्वरीत मागे घेऊन नविन कर आकारणी करण्यात यावी, यासाठी शिवसेना धुळे महानगर वतीने मोठे जनआंदोलन सहसंपर्कप्रमुख महेश मिस्त्री, हिलाल माळी, जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे, उपजिल्हाप्रमुख किरण जोंधळे, महानगरप्रमुख धीरज पाटील, डॉ. सुशील महाजन, देविदास लोणारी, ललित माळी, भरत मोरे, जयश्री वानखेडे, पुष्पाताई बडगुजर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. या प्रसंगी नोटीसांची होळी करण्यात येवुन आयुक्तांना घेराव टाकण्यात आला. या प्रसंगी शिवसैनिकांसह पदाधिकाऱ्यांसह उपमहानगरप्रमुख, विभागप्रमुख व भागातील नागरिक मोठ्या संख्येत उपस्थित होते.




# स्वस्त धान्य दुकानात गहू आला तर डाळ नाही

## दोनच पर्यायाचे निर्बंध आहेत का !

आधुनिक केसरी न्यूज

**बहादुर चव्हाण**

**देव्हारी :** सरकारी स्वस्त धान्य दुकानात (रेशन दुकान) जणू धान्याचे दोनच पर्याय ठेवण्याचे निर्बंध आहेत, अशी स्थिती आहे. तांदळासह कधी गहू दिला जातो तर कधी मका. धान्याची गुणवत्ता तर कधीच चांगली नसते. यावेळी तांदळासोबत गहू दिला जात असला तरी डाळ आलेली नाही. गेल्या महिन्यात शासनाकडून मोफत धान्य देण्याची घोषणा करण्यात आली होती; परंतु संबंधित विभागात नेहमीप्रमाणे दिरंगाईचे क्रम सुरू राहिले.

पीओएस मशीनमध्ये धान्याचे अपलोडींग उशिराने झाले आणि संपूर्ण प्रक्रियेला उशीर झाला. खरे तर धान्याच्या पुरवठ्याला अत्यावश्यक सेवा समजून विभागाने गांभीर्य दाखवायला हवे होते; मात्र तसे झाले नाही. आधी रेशन दुकानातून तुरीची डाळ मिळत होती; परंतु काही महिन्यांपासून मिळणारी डाळ अत्यंत निम्न प्रतिची आहे. चणा डाळ उपलब्ध करवून देण्यात विभाग कमकुवत ठरत आहे. लाखो कार्डधारकांना सद्यःस्थितीत सरकारी धान्याची गरज आहे; परंतु त्यांना केवळ तांदूळ आणि गव्हावरच गुजराण करावी लागत आहे. विशेष म्हणजे, नागरिकांच्या गरजेशी संबंधित या बाबीकडे आपल्या पोळ्या शेकणाऱ्या राजकीय पक्षांचे कार्यकर्ताही मौन धारण करून आहेत. संकटाच्या या काळात धान्याचे पर्याय उपलब्ध करवून देण्यावर भर दिला जात नसल्याचे दिसून येते.

# दलित विद्यार्थ्याच्या हत्येबाबत, संविधान समितीचे प्रधानमंत्री यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** राजस्थान राज्यात जालौर जिल्हात सुराणा गावातील सरस्वती विद्यालयात ईयत्ता 3 रीत शिकणारा 8 वर्षिय इंद्रकुमार हा निष्पाप दलित विद्यार्थी, शाळेतील सार्वजनिक माठातुन पाणी प्यायल्याने, तीथे दलित व सवर्ण विद्यार्थी अलग अलग, बसविले जातात. जातीयवाद सवर्ण शिक्षक छैलसिंह याने पाहुन द्वेष भावनेने बेदम मारले. त्यात विद्यार्थ्यांचा उपचारादरम्यान दि. 15 ऑगस्ट रोजी अहमदाबाद येथे मृत्य झाला.

जातियवादी शिक्षकास फाँसीची शिक्षा द्यावी, शाळेची मान्यता रद्द करावी, अनुसुचित जाती जमाती अत्याचार कायद्यात सुधारणा करून अत्याचारीस जन्मठेप व खुन, बलात्कार केस मधे फाशीचीच शिक्षा द्यावी, संपुर्ण देशात अनुसुचीत जाती जमाती केस करीता प्रत्येक जिल्ह्यात विशेष न्यायालयाची स्थापना करावी व जे राज्य सरकार अशा घटनाकडे दुर्लक्ष करेल ते सरकार बरखास्त करावे, या मागणीचे निवेदन देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना दि.18 रोजी समविचारी संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांना दिले.



त्यावेळी संविधान संरक्षण समितीचे हरिचंद्र लोंढे, प्रभाकर खंडारे, दिपकुमार साळवे, रत्नशिल सोनवणे, भगवान वाघ, कामगार संघटनेचे, एस.यु. तायडे अप्पा, दिनेश पेंढारकर, समविचारी पत्रकार संघाचे श्रीकृष्ण बेडसे, छोटुलाल मोरे, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे एल.आर. राव, मार्कवादी कम्युनिस्ट पक्षाचे पोपटराव चौधरी, भिम आर्मि संघटनेचे भैय्यासाहेब वाघ, विजय भामरे, आनंद अमृतसागर आदी उपस्थित होते.

# औरंगाबादमध्ये अग्निवीर भरतीसाठी गेलेल्या तरुणाचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** अग्निपथ योजनेंतर्गत, भारतीय सैन्य दलाच्या भरतीसाठी औरंगाबाद इथे चाचणी प्रक्रिया पार पडत आहे. त्यामुळे राज्यभरातून तरुण तिथे दाखल झाले आहेत. त्यात ऐन पावसाळ्यात तरुणांना राहायला खायला जागा नसल्यामुळे अनेकांचे हाल होत आहेत. त्यात एक धक्कादायक घटना घडली आहे. काल रात्री 12 वाजताच्या सुमारास चाचणीचा शेवटचा ग्राऊंड काढत असताना अचानक चक्कर येऊन एक तरुण खाली कोसळला. त्याला शासकीय रुग्णालय औरंगाबाद येथे दाखल करण्यात आले.

शासकीय रुग्णालय औरंगाबाद इथे उपचार सुरु असताना आज दुपारी तरुणाचे निधन झाल्याची घटना घडली आहे. करण नामदेव पवार (वय 21) असे या तरुणाचे नाव आहे. हा तरुण विठ्ठलवाडी ता. कन्नड इथला रहिवासी आहे अशी माहिती मिळाली आहे. अग्निवीर भरतीसाठी हा औरंगाबादला आला होता. कारण पवार याच्या पार्थिवावर आता शवविच्छेदन सुरु असायची माहिती मिळत आहे.

गेल्या काही दिवसांआधीही सराव करताना अशाच एका तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. त्यामुळे अग्निवीर भरतीसाठी देशातील तरुण खरंच शाररिरीक रित्या सक्षम आहेत का हा प्रश्न उपस्थित होतो आहे.

तरुणांचे होताहेत हाल अग्नीवीर भरतीसाठी औरंगाबाद



शहरांमध्ये आलेल्या तरुणांचे अतोनात हाल सुरू असल्याचा प्रकार समोर आलेला होता. औरंगाबाद शहरातल्या विद्यापीठाच्या मैदानावर अग्नीवीरांची भरती सुरू आहे. यासाठी संपूर्ण मराठवाड्यातून तरुणांची अलोट गर्दी लोटली आहे. मात्र या तरुणांना ना राहण्याची, ना खाण्याची, ना पिण्याच्या पाण्याची सोय आहे. तर मुलांना 10 रुपयांची पाण्याची बॉटल 30 रुपयाला घ्यावी लागली. त्यामुळे रस्त्यावरती मिळेल तिथे हे तरुण झोपलेले आपल्याला पाहायला मिळतात त्यामुळे भावी जवानांचे कसे हाल सुरू आहेत ही परिस्थिती समोर आली आहे.

भारतीय सैन्य दलामार्फत विविध पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे विदर्भातील दहा जिल्ह्यांमध्ये पुरुष उमेदवारांसाठी नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या प्रक्रियेत सैन्य दलाला जिल्हा प्रशासनाकडून आवश्यक ती मदत केली जात आहे. सैन्य दलाच्या अग्नीवीर भरती प्रक्रियानुसार विदर्भातील नागपूर, वर्धा, वाशिम, अमरावती, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, अकोला, यवतमाळ या दहा जिल्ह्यांमध्ये सैन्य दलातील काही पदांची भरती सुरू करण्यात आली आहे.



# पंचायत समिती स्वराज्य मोहिमेत ३०० विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** स्वतंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत "स्वराज्य मोहीम" पैठण तालुक्यात ९ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट या कालावधीत गटविकास अधिकारी डॉ. ओमप्रसाद रामावत यांच्या नियोजनबद्ध पद्धतीने ७५ उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने दि.१३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट हर घर तिरंगा, प्रभात फेरी, विविध शालेय स्पर्धा, कोविड विशेष लसीकरण, स्वच्छता मोहीम, वृक्ष लागवड, हर घर जल मोहीम, बचत गटाचे उपक्रम, इत्यादी उपक्रम प्रामुख्याने तालुक्यात विविध विभागांच्या माध्यमातून राबविण्यात आले.

पंचायत समिती कार्यालय स्तरावर ९ ऑगस्ट क्रांती दिन ७५० विद्यार्थिनी, पैठण न्यायालयाचे न्यायाधीश, उपविभागीय पोलिस अधिकारी, गटविकास अधिकारी, तहसीलदार, पोलिस निरीक्षक या प्रमुख प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सामुहीक राष्ट्रगान घेण्यात आले. १३ ऑगस्ट रोजी ७५ दिव्यांगाच्या उपस्थित दिव्यांगाच्या हस्ते ध्वजारोहण, १४ ऑगस्ट रोजी कोविड साथरोगामुळे झालेल्या विधवांच्या परिस्थितीत व विधवांच्या हस्ते ध्वजारोहण, १५ ऑगस्ट रोजी शासकीय ध्वजारोहण, स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण, १७ ऑगस्ट रोजी पंचायत समिती अधिकारी व कर्मचारी व ३०० विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत सामुहीक राष्ट्रगान घेण्यात आले. विविध शालेय स्पर्धेत विजेते ३०० विद्यार्थ्यांना पंचायत समिती प्रशासनाच्या वतीने प्रमाणपत्र व बक्षीसे देण्यात आली. तसेच स्वराज्य महोत्सवाची यशस्वी अंमलबजावणी केलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना प्रमाणात देऊन सन्मानित करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांनी सांस्कृतीक कार्यक्रम सादर केला. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रामविकास अधिकारी दशरथ खराद व केंद्र प्रमुख एस.बी. शिंदे यांनी केले.

बक्षीस वितरण व अधिकारी व कर्मचारी यांना प्रमाणात वितरण गटविकास अधिकारी डॉ. ओमप्रसाद रामावत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सहा गटविकास अधिकारी कालुराम बागुल, गट शिक्षणाधिकारी श्रीराम केदार, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सय्यद अजहर आली, बालविकास प्रकल्प अधिकारी ज्योत्स्ना गहीरवाल, केंद्र प्रमुख, मुख्याध्यापक, उपअभियंता ग्रामीण पाणी पुरवठा अशोक घुगे, उपअभियंता बांधकाम संभाजी असोले, कृषी अधिकारी विकास पाटील, आर.एस. पाटील, बालविकास प्रकल्प अधिकारी शिवाजी वणे, ग्रामविकास अधिकारी दशरथ खराद, सहाय्यक प्रशासन अधिकारी एस.व्ही. चव्हाण, कनिष्ठ प्रशासन अधिकारी राजेश कांबळे, शिक्षण विभागाचे सतिश आखेगावकर या विभाग प्रमुखांसह पंचायत समिती पैठण शिक्षण विस्तार अधिकारी अनिल पुदाट, केंद्र प्रमुख एस.बी. शिंदे, यु.ई.खरात, एस.बी. गोर्डे, गणपत मिटकर, विस्तार अधिकारी पंचायत अशोक घोडके, सी.एस. ढवळे, एस.एल. इंगळे, विस्तार अधिकारी कृषी एस.डी. चांदणे, ए.डब्लु. जाधव, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक जी.एम. निसरगंध, संदिप एडके, अविनाश चोपडे, बी.बी. दानेकर, वरिष्ठ सहाय्यक जी.जी. एंपलवार, रीयाज शेख, कनिष्ठ सहाय्यक एस.आर. पवार, लहु तेलुरे, मोहन गाभुड, मथुरा बढे, दिनेश सवने, ग्रामविकास अधिकारी ईश्वर सोमवंशी, जिजाभाऊ मिसाळ, आपले सरकार तालुका व्यवस्थापक निखिल खिस्ती, संगणक चालक हर्षद गोपीनारायण, अरुण डोंगरे, महानेट तालुका व्यवस्थापक ज्ञानेश्वर ठोंबरे, गट समन्वयक संतोष जाधव, समुह समन्वयक अनिता तायडे, परिचर प्रविण शिंदे, सुनील चव्हाण, देविचंद भडके, वैशाली साळवे, माधव सूर्यवंशी, शोभा वीर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रामविकास अधिकारी दशरथ खराद व केंद्र प्रमुख एस.बी. शिंदे यांनी केले तर आभार प्रदर्शन शिक्षक गणपत मिटकर यांनी केले.

# बँक ऑफ महाराष्ट्रच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** कोरोना लॉकडाउनमुळे गेली अडीच वर्षे होऊ न शकलेला बँक ऑफ महाराष्ट्र रिटायर्ड एम्प्लॉईज ऑर्गनायझेशनच्या औरंगाबाद विभागाचा सहामाही मेळावा बुधवार दि.१७ ऑगस्ट रोजी कलश मंगल कार्यालय येथे उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात मार्गदर्शन करण्यासाठी पुण्याहून मध्यवर्ती कार्यकारिणीचे शशीकुमार चौधरी (अध्यक्ष), मोहन घोळवे (कार्यकारी अध्यक्ष), माधव लेले (उपसचिव) आणि बी.जी. माणकेश्वर (उपाध्यक्ष) यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचा प्रारंभ शशीकांत आचार्य यांनी गायलेल्या श्रमिक गीताने झाला. नंतर, मागील बैठकीनंतर आजपर्यंत दिवंगत झालेल्या संघटनेच्या सभासदांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. संघटन सचिव सुरेश कुलकर्णी यांनी नंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

गत सहामाहीत ज्या सदस्यांनी पंचाहत्तरीत पदार्पण केले आहे त्यांचा या प्रसंगी पाहुण्यांच्या हस्ते शाल, श्रीफळ देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला. सर्वश्री के.एल. कुलकर्णी, चंपत जाधव, सतीश वैद्य, श्रीराम कुर्डुकर हे सत्कारमूर्ती होते. त्याचप्रमाणे सोहम खांबेटे, अतुल खेरडे, संध्या जोशी आणि




गीता संवत्सर यांचा त्यांच्या विशेष कार्यासाठी पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विभागीय सचिव रामराजा कुलकर्णी यांनी अर्धवार्षिक अहवाल सादर केला.

यानंतर मोहन घोळवे यांनी संघटनात्मक कार्याचा आढावा घेतला. उपाध्यक्ष माणकेश्वर यांनी नंतर सभासदांच्या विविध प्रश्नांवर संघटनेमार्फत चालू असलेल्या प्रयत्नांचा तसेच विविध कोर्ट केसेस चा विस्तृत अहवाल सादर केला. अध्यक्ष चौधरी यांनी अध्यक्षीय समारोपात संघटनेच्या सामाजिक कार्याविषयी विवेचन केले. सर्वांनीच औरंगाबाद विभागाच्या एकूणच कामाविषयी गौरवोद्गार काढले. कार्यकारिणी सदस्य अशोक भालेराव यांच्या आभार प्रदर्शनानंतर मेळाव्याची सांगता झाली.



# भारतीय साहित्य व सांस्कृतिक मंचाचा प्रथम वर्धापनदिन उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात भरीव कामगिरी करणारी संस्था म्हणून भारतीय साहित्य व सांस्कृतिक मंच या संस्थेचे समाजातील विविध स्तरांमधून नेहमीच कौतुक होत असते. संस्थेची स्थापना झाल्यापासून अतिशय कमी वेळात उत्तम प्रकारचे कार्य या संस्थेच्या वतीने पहायला मिळत आहे. विविध स्पर्धा, मार्गदर्शन शिबीरे अशा उपक्रमांच्या माध्यमातून ही संस्थने महाराष्ट्रभर आपला विस्तार केला, नुकताच या संस्थेचा प्रथम वर्धापनदिन पुण्यात पार पडला.

विविध उपक्रमांचे आयोजन करत तळागाळातील कवी लेखकांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणारी संस्था हीच या संस्थेची खरी ओळख. हीच आपली ओळख जपत भारतीय साहित्य व सांस्कृतिक मंचाच्या वतीने सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राष्ट्रपती पोलीस पदक विजेते सिताराम नरके, अभिनेत्री सोनाली दळवी, नृत्यदिग्दर्शका सोनाली संखद, भारतीय साहित्य व सांस्कृतिक मंच चे अध्यक्ष विशाल सिरसट या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी होते. तसेच भारतीय साहित्य व सांस्कृतिक मंच चे संस्थापक उपाध्यक्ष विजय जायभाये, कार्याध्यक्षा शिल्पा मुसळे, महिलाध्यक्षा चैताली कापसे यांची विशेष उपस्थिती या कवी संमेलनाला लाभली.

नवोदित कवी, लेखकांकरीता हक्काने काम करणाऱ्या मोजक्याच संस्था आहेत. पण विशेषतः तळागाळातील, दुर्लक्षित नवोदितांना त्यांचं हक्काचं व्यासपीठ भारतीय साहित्य व सांस्कृतिक मंच उपलब्ध करून देत आहे असे उपस्थित मान्यवरांनी गौरवोद्गार काढले व जेव्हा जेव्हा आपणांस मदतीची गरज भासेल तेव्हा आमचे सहकार्य नक्कीच लाभेल असेही आश्वासन दिले.

भारतीय साहित्य व सांस्कृतिक मंच आयोजित या कवी संमेलनासाठी राज्यभरातून कवींनी उपस्थिती दर्शवली, गणेश बनसोडे, विजयकुमार कस्तुरे, बबन महामुने, गोरख पालवे,साक्षी थोरात, विलास सोनवणे, हर्षदा कांबळे, लक्ष्मण भोर यांनी आपल्या कवितांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. संस्थेच्या वतीने वैशाली पडवळ यांना साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जीवनगौरव पुरस्कार प्रधान करण्यात आला. चैताली कापसे व डॉ प्राची बामणे यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भारतीय साहित्य व सांस्कृतिक मंचाच्या लातूर जिल्हा अध्यक्ष योगेश हरणे, ऋतुजा मिसळे, अंजुम शेख, वीणा पाटील, स्वाती दरेकर, प्रतिमा शिंदे, शुभम मोहिते, सुमंत पाटील, श्वेता देशपांडे, जान्हवी अंबुलगे या पदाधिकारी यांनी मेहनत घेत हा कार्यक्रम सर्वांच्या सहकार्याने उत्साहात संपन्न केला त्याबद्दल संस्थेच्या वतीने त्यांचा सन्मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.



# दऱ्या खोऱ्यातील आदिवासी समाज बांधवांना मिळतोय करटुले मधून आर्थिक आधार

आधुनिक केसरी न्यूज

**शंकर बरडे**

**हिमायतनगर :** तालुक्यातील दुधड /वाळकेवाडी ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या डोंगराच्या पायथ्याशी वर्षानुवर्षे वसलेल्या काही वाडया त्यामध्ये वडाचीवाडी, धनेवाडी, बुरकुलवाडी, रामनगर या गावातील आदिवासी बांधवाना रानभाजी कर्टुले ठरतेय वरदान.नांदेड जिल्यात सर्वात मोठी कर्टूल्याची बाजार पेठ म्हणून वाळकेवाडी ओळखली जाते. येथील माल हे थेट भारतात सर्वात मोठी कर्टूल्याची बाजारापेठ असलेले ठिकाण हेंद्राबाद या ठिकाणी दर शुक्रवारी निर्यात केला जातो.

जंगलामधील रान भाज्या तसेच रानफळे विकून उदरनिर्वाह करणारे या भागातील आदिवासी बांधवांना आर्थिक श्रोत निर्माण झाला आहे. रानातील चांगल्या प्रतीच्या आयुर्वेदिक शरीराला उत्तम स्वास्थ्य देणाऱ्या भाज्या व फळे नागरिकांना खायला मिळतात. या रान भाज्यांमध्ये करटुले नामक एक भाजी असून ती भाजी शरीरासाठी अत्यंत चांगली आहे. या भाजीला कुठलीही रासायनिक फवारणी या खत वापरले जाता नाही त्यामुळे नमक दर्जाची भाजी म्हणून ओळखली जाते. नैसर्गिकरित्या पावसाळ्यात येणारी प्रमुख भाज्यांमध्ये कर्टुले अत्यंत पौष्टीक अशी मौसमी भाजी आहे तिला पाहुनी भाजी ही म्हणतात कारण की फक्त पावसाळ्यातच येते आणि वर्षभर मात्र ती गायब असते पावसाळ्यात ती खाल्ल्यानंतर संपूर्ण वर्षभराची उत्तम स्वास्थ्याचे बेगमी करून ठेवायची असते असे सांगतात.

कॅन्सर, हृदयरोग, मधुमेह, मुळव्याध यावर सदर भाजी लाभदायक आहे. सदर भाजी पावसाळ्यात रानात उत्पन्न होते त्यानंतर आदिवासी बांधव सदर भाजी शहरी भागात विकतात. ती भाजी रानात मिळते मात्र काही प्रगत शेतकऱ्यांनी करटुलेची शेती ही केलेली आहे. मात्र ही भाजी वाळकेवाडी भागात रानात मिळते, खूप कष्ट घेऊन भाजी तोडून आणतात व करटोली भाजी शंभर ते दीडशे या भावात जागेवून खरेदी केली जाते. या भाजीला बाजारात प्रचंड मागणी असते एकंदरीत आपल्या शरीरासाठी अत्यंत चांगली पौष्टीक व लाभदायी असलेली भाजी पावसाळ्यात प्रत्येकाने खावी असे आदिवासी बांधव सांगतात. कारण ही भाजी खाल्ल्याने शरीर सुदृढ राहते तसेच गंभीर आजारात प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी सदर भाजी मदत करते. करटोलीची शेती केल्यास आदिवासी बांधवांना आणखी नफा मिळेल व आर्थिक आधार सुद्धा होईल.

# चिकलठाण शाळेत जाण्यासाठी विद्यार्थ्यांचा जीवघेणा प्रवास

## जीव मुठीत धरून काठीचा सहारा घेऊन शाळेसाठी नदी ओलांडून करावा लागतो प्रवास

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील चिकलठाण येथील गांधीरी नदीवरील नळकांडी पुल वाहुन गेल्याने शेतवस्तीवरील चिकलठाण जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेण्यासाठी जाण्याऱ्या विद्यार्थ्यांचा जीवघेणा प्रवास सुरू आहे. मात्र याकडे कुणाो लक्ष नसल्याने पालकांमध्ये तिव्र नाराजी दिसून येत आहे. चिकलठाण गाव तसे पुढाऱ्यांच्या बाबतीत नावाजलेले आहे पण धरणाचा सांडवा या नदीला येऊन मिळतो. सांडव्याचा पाण्याचा ओघ वाढला की अश्या समस्यांना तोंड दयावे लागते.



**माझे जि.प. शाळा चिकलठाण येथे दोन मुले शिक्षण घेत आहे. दरवर्षी पावसाळ्यात अश्या समस्येना तोंड दयावे लागते. सध्या एक नळकांडी टाकली पण पाण्याचा ओघ वाढला की ते वाहुन जाते. या ठिकाणी पक्का पुलाची आवश्यकता आहे.**

**प्रमोद चव्हाण**

गंधेश्वर चिखलठाण रस्ता लगत हा नळकांडी पुल शेतकऱ्यांनी स्वःखर्चाने केला असुन परंतु नदीला सांडव्याचे पाणी वाढल्याने नळकांडी वाहुन गेल्याने विद्यार्थ्यांना शाळेत ये जा करण्यासाठी काठीचा साहरा घेऊन नदी ओलांडावी लागत आहे. याच नदीवर पक्का पुल करून दयावा या मागणीचा जोर धरू लागला आहे. असाच विद्यार्थ्यांचा जीवघेणा प्रवास सुरू राहिला तर विपरीत काही घटना घडली तर याला जबाबदार कोण राहील असाही प्रश्न या ठिकाणी पडला आहे. याकडे गावातील राजकीय लोक व प्रशासन लक्ष देणार का याकडे सर्वाचे लक्ष लागले आहे.





# दि चिखली अर्बन विद्यानिकेतन शाळेमध्ये स्वातंत्र्याचा ७६ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**चिखली :** संपूर्ण देशात आजादी का महोत्सव या निमित्ताने हर घर तिरंगा ही मोहीम राबविण्यात येत आहे. भारताला स्वातंत्र्य मिळून आज 75 वर्षे पूर्ण झाली आहेत म्हणून स्वातंत्र्याचा 76 व्या वर्धापन दिनानिमित्त संपूर्ण भारतभर “आजादी का अमृत महोत्सव” साजरा केला जात आहे. स्वातंत्र्य दिवस हा भारतातील लोक तंत्राचा सर्वात मोठा पर्व आहे. आणि या पर्वाला अधिक प्रेरित करण्यासाठी व देशभक्ती जागृत ठेवण्यासाठी भारत सरकार तर्फे “हर घर तिरंगा” ही मोहीम राबविण्यात येत आहे. या दरम्यान प्रत्येक घरावर राष्ट्रीय ध्वज फडकविण्यात येत आहे. दि चिखली अर्बन विद्यानिकेतन शाळेमध्ये “आझादी का अमृत महोत्सव” या निमित्ताने विविध उपक्रम जसे “प्रधान मंत्री योजना” या विषयावर राख्या बनविण्यात आल्या. तसेच चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा घेण्यात आल्या.

दि चिखली अर्बन विद्यानिकेतन शाळेमध्ये 15 ऑगस्ट २०२२ हा 76 वा वर्धापन दिन एक ‘राष्ट्रीय पर्व’ म्हणून साजरा करण्यात आला. या पर्वाला उपस्थित असणारे चिखली अर्बन बँक बहुउद्देशीय संस्था चिखली उपाध्यक्ष पुरुषोत्तम दिवटे सर, दि चिखली अर्बन बहुद्देशीय संस्था चिखली यांचे सचिव डॉ. आशुतोष गुप्ता, शाळेच्या शैक्षणिक संचालिका सौ.डॉ. पूजा गुप्ता, प्रमुख पाहुणे लाभलेले बँक ऑफ महाराष्ट्राचे मॅनेजर राहुल भंडारे, शाळेचे प्राचार्य गौरव शेटे व सर्व संचालक मंडळ यांची उपस्थिती लाभली. या राष्ट्रीय पर्वाची सुरुवात ही ध्वजारोहनाने झाली. त्यानंतर भारत मातेचे पूजन व दीपप्रज्वलन प्रमुख पाहुणे व अन्य मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान पुरुषोत्तम दिवटे यांनी स्वीकारले.

यानंतर पूर्व प्राथमिक शाळेच्या चिमुकल्या जवानांनी एक सामूहिक गीत सादर केले व त्यानंतर यंगड यांनी सॅक्सोफोन च्या आधारे वाद्य गीत प्रस्तुत केले. त्यानंतर इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थीनिनी एका देशभक्तीपर गाण्यावर नृत्य सादर केले. त्यानंतर कार्यक्रमाची प्रस्तावना शाळेचे प्राचार्य गौरव शेटे यांनी करून दिली व प्रस्तावनेत आझादी का अमृत महोत्सव या निमित्त शाळेत घेण्यात आलेले विविध उपक्रम याबद्दल त्यांनी सर्वांना माहिती सांगितली व भारतातील मिसाईल मॅन डॉ. ए.पि. जे. अब्दुल कलाम यांचे उदाहरण विद्यार्थ्यांना दिले. त्यानंतर काही विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव वर आधारित भाषणे देखील केली व त्यानंतर इयत्ता दहावीत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना सन्मान चिन्ह देऊन त्यांचा सत्कार अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला.

इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी “जयो स्तुते” हे समूह गीत सादर केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी लाभलेले असे राहुल भंडारे यांनी त्यांच्या भाषणातून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले व त्यांच्या कामगिरीबद्दल त्यांचे अभिनंदन केले. त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष पुरुषोत्तम दिवटे यांनी देखील त्यांच्या अध्यक्षीय भाषणात शाळेतील उपक्रम व विद्यार्थ्यांमागील मेहनत घेणाऱ्या सर्व शिक्षक वृंद यांना प्रोत्साहित करून त्यांचे अभिनंदन केले. त्यानंतर डॉ. आशुतोष गुप्ता यांनी त्यांच्या भाषणात झेंड्याच्या तिन्ही रंगांबद्दल विशेष अशी माहिती विद्यार्थ्यांना सांगितली व शाळेत फक्त एक पुस्तके किडा नाही तर एक डोळस विद्यार्थी निर्माण होतो व एक सुजाण नागरिक निर्माण केल्या जातो असे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शितल खंडारे यांनी केले व आभार प्रदर्शन सलमान यांनी केले व कार्यक्रमाची सांगता पसायदान म्हणून करण्यात आली.

# स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त विविध कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज



**भुसावळ :** भारत देशाला स्वातंत्र्य मिळून 75 वर्ष पूर्ण झाल्याचे औचित्य साधून स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करताना स्वराज्य महोत्सवाअंतर्गत विविध कार्यक्रम जळगाव तालुक्यातील कंडारी येथील जिल्हा परिषद मराठी शाळेत उत्साहात पार पडले.

9 ते 17 ऑगस्ट दरम्यान विविध कार्यक्रम घेण्याच्या सूचना शासनातर्फे देण्यात आल्या होत्या. त्यानुसार चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, सामूहिक गीत गायन स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच तीन दिवस ध्वजारोहण करण्यात आले. पहिल्या दिवशी माजी विद्यार्थिनी आफरीन पिंजारी, दुसऱ्या दिवशी सैनिक गोपाळ पाटील तर तिसऱ्या दिवशी स्वातंत्र्यदिनी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष लता मोरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. स्वातंत्र्यदिनी प्रभात फेरी काढण्यात येऊन विविध घोषणा देण्यात आल्या. विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण स्वातंत्र्यदिनी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तिसरी ते पाचवीच्या गटात चित्रकला स्पर्धेत प्रथम वेदिका परदेशी, द्वितीय राधिका भिल्ल तर तृतीय यश सोनवणे व सुकन्या सोनवणे आली. सहावी ते आठवीच्या गटात चित्रकला स्पर्धेत प्रथम संजना कोळी, द्वितीय दुर्गा परदेशी तर तृतीय वैशाली कोळी आली. रांगोळी स्पर्धेत प्रथम श्रावस्ती इंगळे, द्वितीय भाग्यश्री सोनवणे तर तृतीय भाग्यश्री पवार आली. वक्तृत्व स्पर्धेत प्रथम प्रियंका पाटील, द्वितीय सुशील इंगळे तर तृतीय श्रावस्ती इंगळे व नंदिनी चिंचोले आली. सामूहिक गीत गायन स्पर्धेत तिसरी ते पाचवीच्या गटात प्रथम शुभम कृष्णा रोनक रोहित, द्वितीय सिमरन राधिका अफसाना राशी तर तृतीय सुकन्या पल्लवी आयशा अश्विनी आली. सामूहिक गीत गायन स्पर्धेत सहावी ते आठवीच्या गटात प्रथम भाग्यश्री नंदिनी सिनम समीरा, द्वितीय महेक प्रेरणा प्रियंका दुर्गा तर तृतीय वर्षा भारती अस्मिता भारती आली. त्याचप्रमाणे नंदकिशोर सोनवणे यांच्यातर्फे प्रत्येक वर्गातील दोन विद्यार्थ्यांना रोख रकमेची पारितोषिक देण्यात आली. दुसरीतील अनन्या गायकवाड व समृद्धी सोनवणे, तिसरीतील तेजस्विनी मोरे व पूर्वी भिल्ल, चौथीतील रूपाली नाईक व पूजा भिल्ल, पाचवीतील राधिका भिल्ल व वृषाली सोनवणे, सहावीतील वर्षा सोनवणे व अस्मिता भिल्ल, सातवीतील वैशाली कोळी व स्वाती सोनवणे, आठवीतील श्रावस्ती इंगळे व ममता गरूड यांना बक्षीस देण्यात आले. तसेच स्वराज्य महोत्सवाअंतर्गत महिला मेळावा, पालक सभा, माता पालक सभा तर 17 रोजी सामूहिक राष्ट्रगान घेण्यात आले. यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक संतोष वानखेडे, रमेश सूर्यवंशी, विनोद जयकर, गणेश तांबे, डॉ. जगदीश पाटील, सुनंदा रोझोतकर, मंजुषा पाठक, सविता निंभोरे, ज्योती वाघ, साधना सूर्यराव आदींनी परिश्रम घेतले.



पुंडलिकनगरचे शिल्पकार तथा ज्येष्ठ शिवसैनिक स्व.पुंडलिक राऊत यांना पुंडलिक नगर येथे अभिवादन करण्यात आले. यावेळी शिवसेना महानगरप्रमुख किशनचंद तनवाणी, मा.महापौर नंदकुमार घोडेले, पूर्व विधानसभा संघटक तथा मा.स्थायी समिती सभापती संभाजीनगर महानगरपालिका रेणुकादास वैद्य यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रकाश महाजन, वैभव मिटकर, युवासेना जिल्हाप्रमुख हनुमंत शिंदे, पश्चिम चे तालुकाप्रमुख बाळासाहेब गायकवाड, पूर्व चे शहरप्रमुख विश्वनाथ स्वामी, फुलंब्री मतदार संघांचे शहरप्रमुख ज्ञानेश्वर डांगे, पश्चिम चे शहरप्रमुख विजय वाघचौरे, उपशहरप्रमुख संतोष खेंडके, दिग्विजय शेरखाने, रामदास गायके, सूर्यकांत जायभाये, राज निळ, दिलीप बनकर, भास्कर अधाणे, बापू कवळे, विशाल गंगावणे, मनोज सोनवणे, सिद्धार्थ वडमारे, अशोक दामले तसेच मोठ्या संख्येने शिवसैनिक व पदाधिकारी उपस्थित होते.



# पुणे येथे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** दि.16 ऑगस्ट 2022 रोजी सकाळी 10 ते 2 या वेळात मोफत आरोग्य शिबीराचे आयोजन केले होते ह्यूमन राईट्स असोसिएशन फॉर प्रोटेक्शन समाज प्रबोधन चॅरिटेबल ट्रस्ट वुमन्स लिबर्टी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमानाने शरदचंद्रजी भवन बहुउद्देशीन हॉल या ठिकाणी आरोग्य शिबिर संपन्न झाला. यावेळी 150 लोकांनी आरोग्य शिबिराचा लाभ घेतला. शिबीराचे आयोजन जयंत हिरे व रूपाली वांबुरे (पाटील) यांनी केले होते. यावेळी पुण्याचे माजी महापौर दत्ताभाऊ धनकवडे, ह्यूमन राइट्स असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष एम.डी. चौधरी व राष्ट्रीय सचिव जावेद शिकलगार उपस्थित होते.

यावेळी भिकाऱ्यांचे डॉ.अभिजीत सोनवणे, पोतराज समाजातले पहिले डॉ.धर्मराज साठे तसेच कुष्ठरोग्यांसाठी काम करणारे प्रकाश पाटील, मा.स्थायी समिती अध्यक्ष विशाल तांबे, कॉसमॉस बँकेचे संचालक मिलिंद पोकळे, अक्षर मानव संघटनेचे सतीश इंदापूरकर, गुलटेकडी एकता प्रतिष्ठानचे अध्यक्ष गणेश शेरला, विद्यमान नगरसेवक किशोर उर्फ बाळाभाऊ धनकवडे, नगरसेविका मोहिनी देवकर, नगरसेविका अश्विनी भागवत तसेच प्रहार संघटनेचे रुग्णसेवक उमेश महाडिक, स्वीकृत नगरसेवक नाना जगताप, कृषी अधिकारी एस.एस.सावंत, नेहा जोशी, फाउंडेशनचे अध्यक्ष राहुल जोशी, समाजसेवक दिगंबर डवरी, समाजसेवक व निवेदक निर्माती अस्मिता मीराने तसेच अक्षर मानवचे सतीश इंदापूरकर हे उपस्थित होते.

ह्यूमन राईटचे कार्याध्यक्ष आशिष धोत्रे, ह्यूमन राईटचे रिपोर्टर जगताप, उद्योजक सुनील मांगडे, समाजसेवक विजय उर्फ राजाभाऊ लाड, संजय पासलकर, राजाभाऊ पासलकर व मंगेशशेठ अवसरे तसेच साथप्रतिसाद मराठी दैनंदिन वृत्तपत्राचे संपादक चित्रपट निर्माते राजीव पाटील, समाजसेवक गणेशशेठ पवार, स्वीकृत नगरसेवक युवराज रेणुसे, जवाहर कुस्ती संकुलनाचे संस्थापक पैलवान सुनील शेटे, सामाजिक कार्यकर्ते शंभू शिवशरण व कैलास तरटे कार्यक्रमाला उपस्थित होते. यावेळी रिक्षा संघटनेचे अध्यक्ष अनिल झेंडे, रिक्षा संघटनेचे शहराध्यक्ष नवले, आकाशवाणीचे सुप्रसिद्ध निवेदक संजय हिरवे, समाजसेवक चेतन बेंद्रे, सामाजिक कार्यकर्ते जीवन माने तसेच सामाजिक कार्यकर्ते अभिषेक तपकीर, समाजसेवक दीपक माने यांनीही कार्यक्रमाला उपस्थिती लावली. यावेळी नागरिकांनी आरोग्य शिबिराला उत्तम प्रतिसाद दिला. अशा सर्व नागरिकांचे, मान्यवरांचे आभार व्यक्त करण्यात आले.

# औराळा परिसरात मोफत डस्टबीनचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**औराळा :** भारतीय जनता पार्टी, सजग फाऊंडेशन, प्रा.डॉ. संजय गव्हाणे मित्र मंडळ यांच्या वतीने दि.17 ऑगस्ट 22 बुधवार रोजी कन्नड तालुक्यातील देवगाव रंगारी जि.प. सर्कलमधील चांभारवाडी, विटखेडा या गावात ऑनलाइन नोंदणी केलेल्या नागरिकांना मोफत डस्टबीन (कचरा कुंडी) चे वाटप भाजपा जिल्हा सचिव प्रा.डॉ. संजय गव्हाणे यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी बाबासाहेब दाबके, रामेश्वर रावते, ज्ञानेश्वर थोरात, वाल्मिक चौथे, विश्वजित साबळे, प्रदिप रावते, ज्ञानेश्वर हिवाळे, माणिकराव हिवाळे, अशोक गोरे, गोरख धोत्रे, बाबासाहेब हिवाळे, बाबुराव



गाधव, बाळू बनकर, महेश सोनवणे, अनिल गोलहारे, सरपंच गोरख आण्णा रावते, भगवान सवाई, हनिफ भाई, मा सरपंच महेबूब सैय्यद, कडूनाथ विठोरे, बाळू सवाई, रउफ सैय्यद व नोंदणीकृत नागरिक तसेच मोठया संख्येने गावकरी उपस्थित होते.

# गिरडा घाटाच्या वळणावर दिशाफलक लावण्याची आवश्यकता

## सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांची सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सावळदबारा :** बुलडाणा जिल्ह्यातील गिरडा घाट हा विदर्भ, मराठवाडा, खांदेश अशा त्रिवेणी संगमावर असून याच घाटातून औरंगाबाद, जिल्ह्यातील सोयगावसह खांदेशमध्ये जाण्यासाठी मधला मार्ग म्हणून या गिरडा घाट वळण रस्त्याचा वाहन चालक वापर करत असतात मात्र या घाटाच्या वळण रस्त्यावर दिशादर्शक फलक नसल्याने वाहनचालक, प्रवाशी यांची पुर्णतः त्रेधा उडत असल्याचे प्रत्यक्ष दिसून आले आहे.

सविस्तर माहिती अशी की, तालुक्यातील सावळदबारा येथे परब्रम्ह परमेश्वर अवतार भगवान श्री चक्रधर स्वामींचे तिर्थक्षेत्र मंदिर असून हे प्रसिद्ध आहे. हे मंदिर राज्यात तिर्थक्षेत्र म्हणून प्रसिध्द आहे. दररोज हजारो भाविक भक्त चक्रधर स्वामीच्या दर्शनासाठी अनेक राज्यातून येतात.या तीर्थक्षेत्रापासून बुलढाणा जिल्हा हा अवघ्या ३० ते ३५ कि.मी. अंतरावर असल्याने परिसरातील नागरिकांना या गिरडा घाटातूनच पर्यायी मार्ग निवडावा लागतो. हाच एकमेव रस्ता मराठवाड्यातील सोयगाव तालुक्यातील सावळदबारा व परिसरात जाण्यासाठी व खांदेशमध्ये जाण्यासाठी असल्याने येणाऱ्या व जाणाऱ्या वाहनधारकांची नेहमी मोठी वर्दळ असते. रात्रीच्या वेळी बाहेरून येणारे भाविक भक्त यांच्या वाहनाला वळण रस्त्यावर दिशादर्शक फलक नसल्याने याचा फार मोठा त्रास होत आहे.

हा गिरडा घाट बुलढाणा विभागात येत असलेल्या या गिरडाघाटाच्या पायाथ्याशी सरळ एक रस्ता लालमाती, दाताळा व मलकापूरकडे जातो.आणि एक रस्ता हा सावळदबाराकडे जातो मुळातच हा रस्ता वळण असल्याने व नविन असल्याने वाहनधारकांना या रस्त्यावर आपली वाहने चालवताना मोठी अडचण निर्माण होत आहेत. त्यामुळे येथे अपघात होण्याची शक्यता शक्यता नाकारता येत नाही. किंवा रस्ता माहिती नसल्याने नवीन वाहनधारक दिशा फलक नसल्याने ते दुसरीकडेच आपली वाहने सरळ निघून जातात त्यामुळे त्यांची मोठ्या प्रमाणावर त्रेधा उडताना दिसत आहे.

या वळण रस्त्यावरुन आपली वाहने घेऊन जाणारे वाहन चालक याच्यांशी आमचे प्रतिनिधी यांनी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, खांदेशमध्ये जाणारा हा एकमेव मार्ग असलेल्या या वळण रस्त्यावर दिशादर्शक फलक लावण्यात यावा अशी मागणी सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी केली आहे. त्यामुळे फर्दापूर विभागाचे संबंधित विभागाने या घाटातील ठिकठिकाणच्या वळणावर दिशा फलक बसविण्यात यावे अशी मागणी लोकशाही मराठी पत्रकार संघाचे सोयगाव तालुका अध्यक्ष गोकुळसिंग राजपूत यांनी केली आहे.

या गिरडाघाटाच्या पायथ्याशी रोडवरील वळणावर रात्रीच्या वेळी तर नविन वाहनधारकांना गाडी चालवताना मोठी अडचण निर्माण होत आहेत. सावळदबारा येथे चक्रधर स्वामी मंदीरावर वळणाकडे सुद्धा दिशा फलकच नाही या ठिकाणी गाडीजवळ येईपर्यंत तर वाहने दिसत नसल्यामुळे गाडी खाली जात आहे. सावळदबारा गावापासून काही अंतरावर सात कि.मी.चे वळण आहे. या वळणावर रात्रीच्या सुमारास नवीन वाहनधारकांना गाडी चालवणे कठीण होत आहे त्यामुळे अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे. सोयगाव तालुक्यातील सावळदबारा येथे श्री चक्रधर स्वामी मंदिर असून या मंदिराच्या दर्शनासाठी देशाच्या विविध राज्यांतील भाविक येथे येत असतात. त्यामुळे या नविन वळण रस्त्यावर दिशादर्शक फलक लावण्यात यावा अशा प्रकारचे निवेदन सार्वजनिक बांधकाम विभाग फर्दापूर यांच्याकडे देण्यात आले आहे. त्यांनी निवेदनात नमुद केले की, या वळण रस्त्यावर तात्काळ दिशा फलक बसविण्यात यावे, अशी मागणी माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी केली आहे.



## न्यायाधीशांच्या निवासस्थानासाठी ६ कोटी ९० लाख मंजूर : आ.फारुक शाह

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** आमदार फारुक शहा यांच्या कामाचा धडाका सतत सुरू आहे. त्याचप्रमाणे धुळे जिल्हा वकील संघाच्या कार्यक्रमात वकील संघांच्यावतीने धुळे जिल्हा न्यायालयातील न्यायाधीशांच्या नुतन निवासस्थानाबद्दल मागणी करण्यात आली होती. या मागणीचा आ. फारूक शाह यांनी गेल्या दोन वर्षांपासून केला. अखेर त्यांच्या पाठपुराव्या यश आल्याने पाठपुरावा न्यायाधिशांच्या निवासस्थानासाठी ६ कोटी ९० लाखाचा निधी मंजुर झाला आहे. न्यायाधीशांचे नुतन निवासस्थान हे पत्रकार भवनाच्या पाठीमागे होणार आहे.

यासंदर्भात अधिक वृत्त असे की, धुळे न्यायालयातील न्यायाधीशांना वेगवेगळ्या ठिकाणी असलेल्या सरकारी क्वॉर्टर्समध्ये अगदी लहानश्या रूममध्ये रहावे लागत होते. त्यात पुरेशा सोयी - सुविधा नव्हत्या परिणामी, त्यांना कल्याण भवनाच्या बाजुला, जिल्हा परिषदच्या समोरील सरकारी अधिकाऱ्यांच्या क्वॉटर्समध्ये रहावे लागत होते ही परिस्थिती बघुन आ. फारुख शाह यांनी सुमारे २ वर्षापूर्वी शासनाकडे न्यायाधीशांच्या निवासस्थानासाठी संपूर्ण प्रस्ताव तयार करून निधीची मागणी केली होती. ती आज रोजी शासनाकडून पुरवणी अर्थसंकल्प २०२२-२३ मध्ये ६ कोटी ९ ० लक्ष रुपये न्यायाधीशांच्या निवासस्थानासाठी मंजुर करण्यात आले आहे. आ. शाह यांच्या पाठपुराव्याला यश आल्याने शासकीय अधिकारी वर्गातुन समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

## चाळीसगाव रोड पोलीस स्टेशनची मोठी कारवाई; अट्टल चोर गजाआड

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** येथील शांतीनगर भागात राहणारे अरुण श्रीधर केले फिर्याद दिली की अज्ञात चोरटयांनी राहते घराचे दरवाजाचे कडी कुलूप तोडुन त्यावाटे आत प्रवेश करून घरात ठेवलेले लोखंडी गोदरेज कपाटाचे लोखंडी दरवाजा तोडून त्यात ठेवलेले बरणीतील ४१,००० रु. रोख रक्कम व १० ग्रॅम सोन्याची माळ असा एकूण ५१,००० रुपयाची घरफोडी चोरी केली. याबाबत चाळीसगाव पो.स्टे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सपोनि संदीप पाटील यांना गुप्त बातमीदार यांचे मार्फतीने मिळालेल्या माहितीवरुन मिनाज मोहमंद रमजान अन्सारी याने केलेला असल्याबाबत माहिती मिळाल्याने सपोनि संदीप पाटील यांनी पोउनि विनोद पवारसह शोध पथकातील कर्मचारी यांना सदर इसमास ताब्यात घेवून पुढील तपास करण्याबाबत आदेशित केले त्यावरुन पथकांने सदर तिरंगा चौक, धुळे येथून ताब्यात घेतले. त्याचेकडे सविस्तर विचारपुस केली असता त्याने सदर गुन्हा केल्याची कबुली दिली तसेच त्याची अंगझडती घेतली असता त्याचे पॅन्टच्या खिशात ५,००० रु. रोख मिळून आले तसेच त्यास न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने पोलीस कोठडी मंजूर केल्याने त्यास पुन्हा विश्वासात घेवून विचारपुस केली असता त्याने गुन्हयातील उर्वरित रोख रक्कम १०,००० रुपये काढून दिले आहे. तरी सदर गुन्हयात एकूण १५००० रु. हस्तगत करण्यात आले तसेच सदर गुन्हयाचा पुढील तपास हेका संदीप पाटील हे करीत आहेत.

आरोपी मिनहाज मोहमंद रमजान अन्सारी याचेविरुध्द जिल्हयात अनेक गुन्हे दाखल आहेत. सदरची कारवाई पोलीस अधिक्षक प्रविणकुमार पाटील, अप्पर पोलीस अधिक्षक प्रशांत बच्छाव, उपविभागीय पोलीस अधिकारी धुळे शहर विभाग धुळे ईश्वर कातकडे यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली सपोनि संदीप पाटील, पोउनि विनोद पवार, पोउनि संदीप काळे, हेकॉ पंकज चव्हाण, भुरा पाटील, संदीप पाटील, स्वप्नील सोनवणे, चेतन झोलेकर, इंद्रजित वैराट, शरद जाधव, प्रशांत पाटील यांनी केली आहे.

## तांबे डोणगाव येथे अमृत महोत्सवानिमित्त जि.प.प्रा. शाळेत विविध उपक्रमांतर्गत स्पर्धा बक्षिस वितरण

आधुनिक केसरी न्यूज

**संभाजीनगर :** पैठण तालुक्यातील तांबे डोणगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत स्वातंत्र्याच्या 75 व्या अमृत महोत्सव निमीत्त जि.प. उच्च प्रा शाळा डोणगाव ता. पैठण येथे विविध उपक्रमाअंतर्गत निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वकृत्व स्पर्धा यांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धामध्ये ज्या विद्यार्थांनी चांगली कामगिरी केली त्यांचे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक काढण्यात आले होते. त्या निमित्ताने विद्यार्थांना दि.१८ ऑगस्ट 2022 रोजी बक्षीस वितरण करण्यात आले.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक अंकुश चव्हाण तर प्रमुख पाहुणे म्हणून शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष निवृत्ती तांबे तसेच पोलिस बॉईज असोसिएशन महाराष्ट्र राज्य चे पैठण तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील तांबे, शालेय समिती सदस्य सोपान तांबे, ग्रामपंचायत सदस्य प्रभाकर तांबे,



तुळसे, कृष्णा तांबे, ज्येष्ठ पदवीधर शिक्षक सतिष वैद्य, धिरज पराये, अन्सार शेख, सहशिक्षक रणधिर पठारे, मनोज जोशी, योगेश पवार, विक्रम राठोड, गोवर्धन खाडे, शंकर बनसोडे, आसिफ शेख उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन योगेश पवार यांनी तर आभार पठारे यांनी मानले. तर विद्यार्थी तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिकांसह सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.



## ७५ व्या अमृत महोत्सवानिमित्त १५० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**औराळा :** आपल्या भारत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ७५ व्या अमृत महोत्सवी हर घर तिरंगा हा उपक्रम संपूर्ण देश भरात राबवला व जनतेनेही देशाची ताकद या एकजुटीतून संपूर्ण जगाला दाखवून दिली. देशभरात वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

त्यातच कन्नड तालक्यातील मक्रणपुर येथे दि.१५ ऑगस्ट २०२२ रोजी अमृत महोत्सव दिनानिमित्त शनैश्वर क्रिकेट सोशल ग्रुप तर्फे मक्रणपूर येथील जिल्हा परिषद शाळेत 150 विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपून जा शाळेत आपण शिकलो तेथे आपण काही चांगलं करू शकतो, या उद्देशाने तेथील माजी विद्यार्थी यांनी हा उपक्रम यशस्वी केला. यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक जीवनात पुढे जाण्यासाठी नक्कीच प्रेरणा मिळाली. ग्रुप तर्फे केलेल्या या कार्याचे शाळे तर्फे खूप आभार मानण्यात आले. या उपक्रमासाठी सर्व शनैश्वर क्रिकेट ग्रुप व सर्व मित्रमंडळी यांनि परिश्रम घेतले. यावेळी उपस्थित मुख्याध्यापक पवार, सर्व शिक्षक वर्ग, ग्रामस्थ मंडळी, पालक वर्ग उपस्थित होते. सर्वांनी शनेश्वर सोशल ग्रुप चे आभार व्यक्त केले. सर्व ग्रुप चे शाल, हार, श्रीफळ देऊन शाळेतील शिक्षकांनी स्वागत केले.

## सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

### एसटीडी/एच.आय.व्ही...

आधुनिक केसरी

एचआयव्हीमुळे एड्स होतो आणि शरीराची प्रतिकारशक्ती कमी होऊन नंतर ते दगावतात. काही लक्षणांमध्ये ताप येणे, शरीरावर रॅश येणे, जखमा होणे तसेच रात्री घाम येणे, अंधुक दिसणे अशी लक्षणे दिसून येतात.

**एच.आय.व्ही. एड्सच्या प्रामुख्याने तीन अवस्था कोणत्या ?**

**स्टेज–१)** ही एक फ्लूसारखी दिसणारी अवस्था असते.

**स्टेज - २)** ही अवस्था १० वर्षे असू शकते आणि यात काहीही लक्षणे दिसत नाहीत.

**स्टेज - ३)** या स्टेजमध्ये व्यक्तीच्या शरीरातील प्रतिकारशक्ती कमी झालेली असते ती कुठल्याही संसर्गाला बळी पडते.

**एच.आय.व्ही. एड्सची लक्षणे कोणती ?**

१. वारंवार येणारा ताप - वारंवार येणारा ताप हे यातले पहिलं प्रमुख लक्षण यात फ्लू सारखी लक्षणं असतात. तसेच थकवा येणे, घसा येणे, मळमळ होणे आणि गाठी येणे याचाही समावेश होतो. २. स्कीन रॅश - या लक्षणांमध्ये लाल, पिवळे, गुलाबी किंवा जांभळ्या रंगाचे पट्टे हे नाकातोंडावर आणि पापणीवर येतात. ३. वाढणाऱ्या गाठी - यामध्ये शरीराच्या काखा, मान, जांग या भागात गाठी वाढतात. ४. सांधेदुखी व स्नायु दुखी - शरीराचे सांधे आणि स्नायु दुखत असतील आणि सोबत गाठीही असतील तर ती ही एच.आय.व्ही. एसड्सची लक्षण असू शकतात. ५. लूज मोशन्स (डायरिया) - यामध्ये लूज मोशन्स या सात दिवसांपेक्षा जास्त काळ राहिल्या तर तेही लक्षण म्हणता येते. ६. वजन कमी होणे - अचानक वजन कमी होऊन, संडास व उलट्या होणे हा प्रकार वाढल्यास एच.आय.व्ही. एड्स अंतिम टप्प्यात असल्याचे मानले जाते. ७. न्यूमोनिया - खोकला, सर्दी, वजन कमी होणे, डायरिया व नंतर न्यूमोनिया अशा टप्प्याने ही लक्षणे दिसून येतात. ८. रात्री घाम येणे - हेही एक प्रमुख लक्षण मानले गेले आहे. ९. फंगल इन्फेक्शन - नखं पिवळी होऊन ठिसूळ, पांढरी पडून तुटणे, तोंडामध्ये इन्फेक्शन निर्माण होणे ही लक्षणं यात दिसतात. १०. मेमरी लॉस-डिप्रेशन - एवढी सगळी लक्षण दिसल्यानंतर अर्थातच त्या व्यक्तीला संभ्रमावस्था येते ज्यात तो दैनंदिन आयुष्यातल्या छोट्या-छोट्या गोष्टीही विसरू लागतो आणि वारंवार होणाऱ्या या तक्रारी कमी होत नसल्याने त्याच्यावर मानसिक ताण येऊन ती व्यक्ती वैफल्यग्रस्त (डिप्रेशन) होते. **(क्रमशः)**

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com


काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in